सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १४४ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पंतप्रधानांनी स्वत:च्याच विरोधात विधेयक आणले- अमित शाह

## दोषी लोकप्रतिनिधींच्या राजीनामा विधेयकावर बोलले गृहमंत्री

नवी दिल्ली, २५ ऑगस्ट : केंद्र सरकारकडून मांडण्यात आलेल्या संविधान (१३० वी दुरुस्ती) विधेयक, २०२५ म्हणजे पंतप्रधानांनी स्वतःच्या विरोधात आणलेले बिल असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. एका मुलाखतीत त्यांनी उपरोक्त विधान केले.

यासंदर्भात शहा म्हणाले की, विरोधकांकडून कितीही तीव्र विरोध झाला तरी हे विधेयक नक्कीच मंजूर होईल. या विधेयकात असा प्रस्ताव आहे की जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा कोणताही मंत्री गंभीर गुन्ह्यात दोषी आढळून सलग ३० दिवस तुरुंगात असेल आणि त्या गुन्ह्याची शिक्षा ५हे विधेयक 'संवैधानिक नैतिकता' आणि जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी आवश्यक आहे. हे कोणत्याही एका पक्षावर किंवा नेत्यावर केंद्रित नाही, तर सर्वसामान्यपणे सर्वांवर लागू होईल मग तो सत्ताधारी पक्षाचा असो किंवा विरोधी पक्षाचा असला तर दोघेही कायद्यापुढे समानच असतील. मोदींनी स्वतःच्या पदालाही या विधेयकात समाविष्ट केले आहे. इंदिरा गांधी यांनी ३० वी दुरुस्ती करून राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व लोकसभा अध्यक्षांना न्यायालयीन तपासातून वगळले होते. मात्र नरेंद्र मोदींनी स्वतः विरोधातच असे विधेयक आणले आहे की, जर पंतप्रधान तुरुंगात जात असतील, तर त्यांना राजीनामा द्यावा लागेल असे शाह म्हणाले. विधेयक सध्या ३१ सदस्यीय संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवले गेले आहे, जिथे त्यावर सखोल चर्चा व सूचनांची अपेक्षा आहे.



मला पूर्ण विश्वास आहे की हे विधेयक पास होईल. काँग्रेससह अनेक विरोधी नेतेही नैतिकतेचा पाठिंबा देतील असे शाह यांनी सांगितले.

तसेच सरकार या विधेयकाच्या माध्यमातून भाजपेतर सरकारांना अस्थिर करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला आहे. यावर शहा यांनी उत्तर दिलं की, आपल्या देशातील न्यायव्यवस्था ही अत्यंत सशक्त आहे आणि ती या कायद्याचा गैरवापर होऊ देणार नाही. ३० दिवसांनंतर राजीनामा द्यावा लागतो, पण त्याआधीच न्यायालय ठरवेल की जामिन दिला जावा का नाही. आम आदमी पार्टीचे संयोजक अरविंद केजरीवाल यांचा उल्लेख करत शहा म्हणाले की, त्यांना ३० दिवसांच्या आतच जामिन मिळाला होता. माझ्या मते, त्यावेळी त्यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यायला हवा होता. लोकांनी दबाव टाकल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. पण आता ते केवळ नैतिकतेवर न राहता कायद्याच्या बंधनात येईल. अमित शहा यांनी स्पष्ट केले की, जर एखाद्या नेत्याला ३० दिवसांनंतर जामिन मिळाला, तरी तो पुन्हा पदावर येऊ शकतो - शपथ घेऊन. म्हणजेच हे विधेयक कोणावर अन्याय करण्यासाठी नसून, नैतिकता व उत्तरदायित्व यावर केंद्रित आहे.

तृणमूल काँग्रेसने जेपीसीवर बहिष्कार टाकल्याबद्दल शहा म्हणाले की, आम्ही त्यांना सहभागी होण्याचे संपूर्ण संधी दिली आहे. संसदेच्या नियमांना झुगारून सर्वकाही आपल्या अटींवर चालेल, ही अपेक्षा चुकीची आहे. सरकार सर्व पक्षांना सहभागी होण्याची संधी देत आहे. जर ते नाकारत असतील, तर आम्ही काय करणार ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तसेच या विधेयकावर सर्वच पक्षांनी आपली मते मांडणे गरजेचे आहे. जर विरोधकांनी पुढची ४ वर्षे पाठिंबा दिला नाही, तरी देश थांबणार नाही. परंतु, जनता सर्व पाहत आहे हे सर्वांनी लक्षात ठेवावे असे शाह यांनी सांगितले.

# वैंभव खेडेकर भाजपाच्या वाटेवर, मनसेतून ४ जणांची हकालपट्टी

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून वैभव खेडेकर यांच्या नावाची चर्चा सुरु होती, वैभव खेडेकर भाजपमध्ये जातील अशीही शक्यता वर्तवली जात होती. मात्र आज अखेर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून वैभव खेडेकरांना बडतर्फ करण्यात आलेले आहे. वैभव खेडेकर लवकरच भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश करणार असल्याची शक्यता वर्तवली जात होती मात्र आज अखेर त्यावर शिक्कामोर्तब झालं आहे. वैभव खेडेकर पुढच्या आठवड्यात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. गेल्या काही दिवसांपासून खेडेकर हे पक्षात नाराज असल्याच्या चर्चा रंगत होत्या. या नाराजीच्या पार्श्वभूमीवर त्यांना मनसेकडून थेट बडतर्फ करण्यात आलं. यानंतर त्यांच्या पुढच्या राजकीय वाटचालीबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात होते. अखेर खेडेकर यांच्या पक्षप्रवेशाची वेळ आणि तारीख ठरली असून थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ४ किंवा ५ सप्टेंबरला मुंबई येथे त्यांचा पक्षप्रवेश होणार आहे. आधी ५ तारीख ठरली मात्र पुन्हा ४ तारीख ठरली असल्याची माहिती आहे.

काही दिवसांपूर्वी शिवसेनेचे नेते रामदास कदम आणि पालकमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत खेडेकर यांना शिवसेनेत प्रवेशाची ऑफर दिली होती. त्यामुळे त्यांचा शिवसेनेत प्रवेश होणार अशी चर्चा सुरू झाली होती. मात्र त्यांच्या भाजप प्रवेशाची चर्चा सध्या सुरु आहे. त्यांच्या प्रवेशासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि जिल्हा संपर्क मंत्री नितेश राणे थेट लक्ष घालत असल्याचं समजतं. यासंदर्भात काही महत्त्वाच्या बैठकाही पार पडल्या असल्याचे बोलले जात आहे.खेडेकर यांच्या पुढील राजकीय प्रवासाबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली असून, ते भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. वैभव खेडेकर हे मनसेला सोडचिठ्ठी देणार अशा चर्चा गेल्या काही महिन्यापासून सुरू असताना आता थेट खेडेकरांना पक्षातून बडतर्फ करण्यात आले आहे. मनसेकडून वैभव खेडेकर यांच्यासह अविनाश सौंदळकर, संतोष नलावडे, सुबोध जाधव यांना मनसेकडून पत्र पाठवण्यात आले आहे. पत्रात म्हटले आहे की, आपण पक्षाच्या नियमांचे आणि धोरणांचे उल्लंघन केल्यामुळे, तसेच पक्षविरोधी कार्य केल्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने तुम्हाला पक्षातून बडतर्फ करण्यात येत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुका व २०२९ साली होणाऱ्या विधानसभा निवडणुका त्या दृष्टीने भाजपाने कोकणात मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्याचाच भाग म्हणून चिपळूण येथील उद्योजक ज्येष्ठ नेते खासदार शरद पवारांचे खंदे शिलेदार व आमदार शेखर निकम यांच्या विरोधात निवडणूक लढवलेले प्रशांत यादव यांना भाजपा प्रवेश देण्यात आला. आता दापोली खेड मंडणगड विधानसभा मतदारसंघावर भाजपाने लक्ष केंद्रित केल्याची माहिती आहे. याचाच भाग म्हणून राज ठाकरे यांचे कोकणातील शिलेदार मनसेचे कोकणसंघटक वैभव खेडेकर यांचा लवकरच भाजपा प्रवेश होणार आहे. वैभव खेडेकर यांच्या भाजपा प्रवेशाचा मुहूर्तही ठरलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच कोकणात मनसेला मोठा धक्का बसला आहे.

# संघाची जोधपूरमध्ये ५ ते ७ सप्टेंबरदरम्यान बैठक



नवी दिल्ली : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची वार्षिक अखिल भारतीय समन्वय बैठक यंदा ५ ते ७ सप्टेंबर या कालावधीत राजस्थानमधील जोधपूर येथे आयोजित केली जाणार आहे. संघ व संघाशी संबंधित वैचारिक संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी ही बैठक दरवर्षी आयोजित केली जाते.

मागील वर्षी ही बैठक केरळमधील पालक्काड येथे झाली होती. या बैठकीत भाजप, विश्व हिंदू परिषद, भारतीय मजदूर संघ, राष्ट्र सेविका समिती, वनवासी कल्याण आश्रम, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय किसान संघ, विद्या भारती यांसह संघ प्रेरित ३२ संघटनांचे राष्ट्रीय अध्यक्ष, संघटनमंत्री व प्रमुख पदाधिकारी सहभागी होणार आहेत.

या बैठकीला सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे, तसेच सर्व सह सरकार्यवाह व अन्य वरिष्ठ पदाधिकारी यांचीही विशेष उपस्थिती राहणार आहे. संघाच्या अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार,या बैठकीत सहभागी संघटना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनुभवांच्या आधारे विविध घडामोडींचे मूल्यांकन सादर करतात.

# आमदार अमित साटम मुंबई भाजपचे नवे अध्यक्ष

मुंबई, २५ ऑगस्ट : आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून आमदार अमित साटम यांची आज, सोमवारी मुंबई अध्यक्षपदी निवड करण्यात आली. भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मावळते अध्यक्ष आशिष शेलार यांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही घोषणा करण्यात आली. साटम हे आपल्या आक्रमक वक्तृत्व शैलीसाठी प्रसिद्ध आहेत.

आमदार आशिष शेलार यांचा मुंबई भाजपा अध्यक्षपदाचा कार्यकाळ संपला. त्यानंतर आता भाजपाने आमदार अमित साटम यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे.

यावेळी पत्रकारांशी बोलताना



फडणवीस म्हणाले की, आशिष शेलार यांनी मुंबई विभागाचे अध्यक्षपद समर्थपणे सांभाळले. २०१७ च्या निवडणुका असतील, आत्ताच्या निवडणुका त्यांनी उत्तम काम केले आहे. मंगलप्रभात लोढा यांनी उत्तम रितीने कार्यभार सांभाळला. पुन्हा आशिष शेलार यांच्याकडे धुरा आली, विधानसभेत चांगले यश मिळाले. मुंबईतील नंबर एकचा पक्ष म्हणून सिद्ध केले.

### अमित साटमांकडे मुंबईच्या राजकारणाची जाण आणि कल्पकता - फडणवीस

दरम्यान नव्या संघटनात्मक रचनांकडे अमित साटम यांच्याकडे भार आला आहे. अमित साटम तीन वेळा आमदार म्हणून निवडून आलेत, नगरसेवक होते. प्रदीर्घ कार्यकाळ राहिला आहे. संघटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. अभ्यासू आणि आक्रमक अशी अमित साटम यांची प्रतिमा आहे. मुंबईच्या राजकारणाची जाण आणि कल्पकता त्यांच्याकडे आहे. येत्या काळात त्यांच्या नेतृत्वाखालील भाजप मुंबईत घोडदौड राखेल, असा विश्वासही फडणवीसांनी व्यक्त केला. पुन्हा महायुतीची मुंबईत सत्ता येईल हा विश्वास आहे. सर्व संघटनात्मक जबाबदाऱ्या ते चांगल्या पद्धतीने पार पडतील. सर्व ज्येष्ठ नेते त्यांच्या पाठीमागे आहेत, असे म्हणत फडणवीसांनी अमित साटम यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### राजकीय कारकीर्द

अमित साटम यांनी गेली अनेक वर्षे मुंबईच्या पश्चिम उपनगरात नगरसेवक, ऑक्टोबर २०१४ पासून तीन वेळा अंधेरी पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यांना मुंबईतील नागरी प्रश्नांची चांगली जाण आहे. त्यांनी विधानसभा आणि विविध व्यासपीठांवर भाजपची बाजू आक्रमकपणे मांडण्याचे काम केले आहे.

साटम यांचा जन्म १५ ऑगस्ट १९७६ रोजी मुंबई येथे झाला. १९९८ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या मिठीबाई कॉलेज ऑफ आर्ट्समधून राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयात बॅचलर ऑफ आर्ट्स पूर्ण केले. पुढे त्यांनी महात्मा गांधी मिशन्स इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, मुंबई विद्यापीठातून मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीजची (कार्मिक) पदवी घेतली.

# पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात भारत प्रगतीचे उंच शिखर गाठत आहे - रामदास आठवले

मुंबई, २५ ऑगस्ट - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत प्रगतीचे उंच शिखर गाठत आहे. जगभर भारत देशाचा लौकीक वाढत आहे. संयुक्त अरब अमिरात आणि भारत देशाचे संबंध दृढ मैत्रीचे आहेत. दुबईत ४० टक्के पेक्षा जास्त भारतीय आहेत. दुबईत हॉटेल व्यवसाय बँकींग क्षेत्र, रियल ईस्टेट या क्षेत्रात भारतीयांचा दुबईत प्रभाव आहे. दुबईतील राज्यकर्त्यांचा दुबईत राहणाऱ्या भारतीयांना पाठिंबा आहे, असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.




दुबईत वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे इंडो अरब इंटरनॅशनल एक्सलन्स अवॉर्डचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते अनेक मान्यवरांना वितरण करण्यात आले.

ग्लोबल मिडीया फॅशन लिगच्या वतीने इंडो अरब इंटरनॅशन्ल एक्सलन्स अवॉर्ड आणि फॅशन शो चे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यात अनेक मान्यवरांना रामदास आठवले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कार सोहळ्यात शारजाचे राजे सुलतान अल कासमीचे सल्लागार शेख सुलतान अल कासीम हे उपस्थित होते. भारतातील प्रसिध्द कलाकार प्रभुदेवा, निर्माते अरबाज खान तसेच अनेक मान्यवरांना आठवले यांच्या हस्ते इंडो अरब इंटरनॅशन्ल एक्सलन्स अवॉर्ड प्रदान करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन ग्लोबल मिडीया फॅशन लिगचे अध्यक्ष तनविर अबुबकर यांनी केले होते. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते.

## सिंहगडावरुन बेपत्ता गौतम चार दिवसांनी जिवंत आढळला

पुणे : पुण्यातील सिंहगड किल्ल्यावरील तानाजी कडा येथून बेपत्ता झालेला २४ वर्षांचा गौतम गायकवाड जिवंत आहे. गौतम २० ऑगस्ट रोजी सिंहगडावरुन बेपत्ता झाला होता. अखेर २४ ऑगस्ट रोजी तो दरीत जिवंत अवस्थेत आढळला. स्थानिकांनी गौतमला दरीतून वर आणले आणि उपचारांसाठी रुग्णालयात दाखल केले.

सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या एका सीसीटीव्हीमधून एक तरुण पळत आणि लपून जात असल्याचा दावा करण्यात आला होता. त्यामुळे गौतम हा कड्यावरून पडला की त्याने स्वतःहून हा बनाव रचवला या संदर्भात पोलीस तपास करत होते.

# बीडमध्ये लक्ष्मण हाकेंच्या गाडीवर दगडफेक, विजयसिंह पंडित यांचे कार्यकर्ते भिडले

बीड : गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार विजयसिंह पंडित यांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार वाद आणि दगडफेक झाली. हा वाद लक्ष्मण हाके यांनी बीडमध्ये ओबीसी समाजाच्या बैठकीत विजयसिंह पंडितांविरुद्ध केलेल्या आक्षेपार्ह विधानामुळे पेटला होता.

ही घटना मागील काही दिवसांपासून सुरु असलेल्या विधानांमुळे पेटली होती. बीडमध्ये ओबीसी समाजाच्या बैठकीत लक्ष्मण हाके यांनी विजयसिंह पंडित यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. हाकेंच्या म्हणण्यानुसार, ओबीसींच्या दारात आले तर दंडुके हातात घेऊ, असे त्यांनी सांगितले. या विधानाने पंडित समर्थकांमध्ये संताप निर्माण केला आणि गेवराई शहरात त्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. आंदोलकांनी पुतळ्यावर आग लावली आणि जोरदार घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.

यावेळी, मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पंडितांच्या समर्थकांनी शहरात बॅनर लावले होते. यावरून हाके यांनी वादग्रस्त विधान केले आणि पंडित यांचे कार्यकर्ते आक्रमक झाले. हाके गेवराईत पोहोचल्यानंतर दोन्ही गटांमध्ये चप्पल भिरकाव, दगडफेक आणि जोरदार घोषणाबाजी झाली. हाकेंच्या गाडीची पुढील काच फुटल्याचे दिसून आले.

हाके यांनी पत्रकारांशी बोलताना विजयसिंह पंडित यांना थेट आव्हान दिले, 'कुणाच्याही दहशतीखाली राहणारे आम्ही नाही आहोत. गावगाड्यामध्ये राहणारे आम्ही आहोत. बास झालं तुमचं शोषण, तुमचा माणूस मुख्यमंत्र्यांना शिव्या देतो. आम्ही सुद्धा मर्दाची औलाद आहे. तुझ्या गावात आलो आहेत ५०० किलोमीटर अंतरावरून. दम असेल तर बाहेर ये' असं आव्हान आमदार विजयसिंह पंडित यांना दिलं आहे.

# मुंबई-जालना वंदे भारत आता नांदेडपर्यंत धावणार

मुंबई : मुंबई आणि मराठवाड्यातील प्रवाशांसाठी एक मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली मागणी अखेर फळाला आली आहे. आता वंदे भारत एक्स्प्रेसचा विस्तार थेट नांदेडपर्यंत करण्यात आला आहे. आधी ही हाय-स्पीड वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेन जालना ते मुंबई या मार्गावर धावत होती. तीही आठवड्यातील सहा दिवस (बुधवार सोडून) प्रवाशांसाठी उपलब्ध होती. मात्र, आता रेल्वे प्रशासनाने मोठा निर्णय घेतला असून, २६ ऑगस्टपासून ही गाडी नांदेडपर्यंत धावणार आहे. रेल्वेच्या या निर्णयामुळे परभणी आणि नांदेडच्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. या मार्गावर प्रवास करणाऱ्यांचा वेळ मोठ्या प्रमाणात वाचणार आहे. ही वंदे भारत एक्स्प्रेस नांदेड ते मुंबईदरम्यानचे ६१० किमी अंतर अवघ्या ९ तास २५ मिनिटांत पूर्ण करेल. या निर्णयामुळे मराठवाड्यातील प्रवाशांच्या प्रवासात अधिक सोय, वेग आणि आरामाची भर पडणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (उडचढ), मुंबई येथून ही वंदे भारत एक्स्प्रेस दुपारी १.१० वाजता सुटणार आहे आणि रात्री १०.५० वाजता नांदेड येथे पोहोचणार आहे. मंगळवारी लोकार्पण सोहळा झाल्यानंतर गुरुवारपासून ही गाडी नियमित धावणार आहे. त्यानुसार, दररोज सकाळी ५ वाजता एच.एस. नांदेड रेल्वे स्थानकावरून वंदे भारत एक्स्प्रेस सुटेल आणि दुपारी २.२५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे पोहोचेल.

# शासकीय कार्यालयात प्लॅस्टिक बॉटल टाळा - अजित पवार

कोल्हापूर, २५ ऑगस्ट - पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्लॅस्टिक टाळणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनात सिंगल युज प्लॅस्टिकचा वापर पूर्णपणे थांबवा. तसेच विविध कार्यालयांबरोबरच शासकीय, निमशासकीय कार्यालयात प्लॅस्टिक बॉटल टाळा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून २५ ऑगस्ट ते ३ डिसेंबर या कालावधीत '१०० दिवस प्लॅस्टिक बंदी अभियान' राबवण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत '१०० दिवसात प्लॅस्टिक दूर.. नक्की करणार आमचं कोल्हापूर' या टॅग लाईनचा प्रचार, प्रसार करण्यात येणार असून या प्लॅस्टीक बंदी अभियानाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते कापडी पिशव्यांचे अनावरण व माहिती



परिपत्रकाचे प्रकाशन जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन सभागृहात करण्यात आले.

यावेळी प्लॅस्टिक न वापरण्याबाबत उपस्थितांनी शपथ घेतली.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, या अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये विविध पक्ष, संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींचा सहभाग घ्या. अभियानात स्वयंसेवी संस्था व अधिकाधिक नागरिकांचा सहभाग घ्या. प्लॅस्टिकच्या दुष्परिणामाबाबतची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवा. सूक्ष्म नियोजन करुन व विविध विभागांच्या समन्वयातून हे अभियान यशस्वी करा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी अमोल येडगे म्हणाले, प्लास्टिकच्या अनावश्यक व वाढत्या वापरामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. प्लास्टिकच्या अमर्याद वापरामुळे भूमीगत वाहिन्या, चेंबर, गटारी, नाले तुंबल्यामुळे तसेच नदीमध्ये प्लास्टिक वाहून आल्यामुळे प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. तसेच मंदिरे, गड, किल्ले, उद्याने, रस्ते अशी सार्वजनिक ठिकाणे प्लास्टिक कचऱ्यामुळे विद्रूप होत आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी तसेच नागरिकांच्या आरोग्यासाठी प्लास्टिकचा वापर थांबवण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. याचसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकांच्या दरम्यान प्लास्टिक बाटल्यांचा वापर पूर्णपणे बंद केला असून याऐवजी कार्यालयात स्टीलच्या बाटल्या वापरण्यात येत आहेत.

प्लास्टिक बंदी अभियान यशस्वीपणे राबवण्यासाठी लोकांचा सहभाग अत्यावश्यक आहे. याच दृष्टिकोनातून २५ ऑगस्ट ते ३ डिसेंबर दरम्यान जिल्ह्यात प्लास्टिक बंदी अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील डिजिटल बोर्ड व होर्डींग्जवर '१०० दिवसात प्लॅस्टिक दूर.. नक्की करणार आमचं कोल्हापूर' ही टॅग लाईन व स्लोगन प्रसारित करण्यात येणार आहे. प्लॅस्टिकचे चहाचे पेले, पत्रावळी, प्लेट, बाऊल, चमचा, स्ट्रॉ, कंटेनर, पाण्याच्या बाटल्या, हॅंडल असलेली प्लॅस्टिकची पिशवी असे एकल वापराचे प्लॅस्टिक टाळण्याचा संदेश देण्यात येणार आहे. तसेच याची व्यापर जनजागृती कागदी, कापडी पिशव्यांचा वापर, स्टील अथवा अन्य धातूंची कायमस्वरुपी बाटल्यांचा वापर वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. प्लॅस्टिक बंदी अभियानात विविध ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था व त्यांची कार्यालये, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, क्रीडा संस्था, माध्यमे, मंदिरे, उद्योजक, व्यापरी, हॉटेल, फेरीवाले, विविध संस्था, संघटना, विविध गट, बचतगट, अंगणवाडी, केटरींग, व्यावसायिक, फेरीवाले संघटना, एमआयडीसी, किरकोळ फळे, फुले, भाजीपाला विक्रेते, आदींच्या सहभागातून हे अभियान राबवण्यात येणार आहे. यासाठी प्लॅस्टिक विरोधी घोषवाक्य, पथनाट्य, रिल्स, पोस्टर्स स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिली.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जिल्हा बँकेतर्फे शेतकऱ्यांना एक हजार कोटी पीक कर्ज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
राज्य व देशभरात सहकारातील यशस्वी बँक म्हणून ओळखली जात असलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने वर्ष २०२५-२०२६ मधील चालू खरीप हंगामासाठी १ हजार ४ कोटी २८ लाखाचे पीक कर्ज वाटप केले आहे. शासनाकडून लातूर जिल्हा बँकेस ९३३ कोटी ९८ लाख एवढे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले होते. इतर बँकांच्या तुलनेत लातूर जिल्हा बँक पीक कर्ज वाटपात पहिल्या स्थानावर असून, 'शेतकऱ्यांच्या हक्काची बँक' ही ओळख लातूर जिल्हा बँकेने कायम ठेवली आहे.

वेळेवर कर्ज वाटप करून शेतकऱ्यांना मोठा आधार देण्याचे काम सातत्याने जिल्हा बँकेकडून होते. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना लातूर जिल्हा बँक आपली बँक वाटते. तो विश्वास कायम ठेवत शेतकरी हित डोळ्यांसमोर ठेवून माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनात बँकेची वाटचाल भविष्यातही अशीच सुरू राहील, असा विश्वास बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

शासनाकडून लातूर जिल्ह्यातील सर्व बँकांना खरीप हंगामासाठी पीककर्ज वाटपाचे ३ हजार १०० कोटी एवढे उद्दिष्ट देण्यात आले होते. यापैकी एकट्या लातूर जिल्हा बँकेने १ लाख ३० हजार २४४ शेतकरी सभासदांना १ हजार ४ कोटी २८ लाख रुपये पीक कर्ज वाटप केले आहे. कर्ज वाटपाचे उद्दिष्ट एप्रिल २०२५ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीसाठी असून, लातूर जिल्हा बँकेने १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत १०८ टक्के एवढे उद्दिष्ट गाठले आहे. सप्टेंबर २०२५ अखेर जवळपास १३५ टक्के पीक कर्ज वाटप झालेले दिसेल, असे बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज देशमुख, व्हाईस चेअरमन ॲड. प्रमोद जाधव यांनी प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## एम. डी. मुक्तापुरेंना गुणवंत अधिकारी पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
यशवंतराव चव्हाण पंचायतराज अभियानांतर्गत लातूर पंचायत समितीचे कृषी अधिकारी एम. डी. मुक्तापुरे यांना सन २०२१ चा महाराष्ट्र शासनाचा गुणवंत अधिकारी पुरस्कार छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते नुकताच देऊन सन्मानित करण्यात आले.

कृषी अधिकारी मुक्तापुरे यांनी लातूर तालुक्यातील ४५० ते ५०० शेतकऱ्यांना शेती मार्गदर्शनाबरोबर गोबरगॅस देऊन त्यांची गॅसच्या पैसाची बचत करून शेतीला चांगले खत उपलब्ध करून देण्यासह इतर चांगली कामे केली. याबद्दल तत्कालीन कृषी विकास अधिकारी एस. आर. चोले, तत्कालीन गटविकास अधिकारी तुकाराम भालके, कृषी विकास अधिकारी सतीश चोरमले, कृषी अधिकारी मिलिंद बिडबाग, आदेश खादिक रुपनवर आदींनी अभिनंदन केले आहे.

## सफरचंदाची आवक वाढली, दर घटले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
ऐन श्रावण आणि गणेशोत्सवाच्या तोंडावर सफरचंदाची बाजारात आवक वाढल्याचे चित्र असून, किरकोळ विक्री शंभर रूपये सव्वा किलोने सुरू असल्याचे रेकॉर्ड घेऊन विक्रेते विकत आहेत.

यावर्षी सफरचंदाची प्रचंड आवक वाढल्याचे चित्र असून, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेशासह विदेशातून आपल्याकडे सफरचंद येतात. संपूर्ण मराठवाड्यात सफरचंद विक्रीचे केंद्र सुद्धा लातुरात आहे. यावर्षी जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेशात सफरचंदाचे उत्पन्न भरघोस प्रमाणात झाल्याने दराची ही परिस्थिती असावी. मात्र, हे किरकोळ विक्रीस येणारे सफरचंद दर्जेदार आहेत की नाही, हे अन्न भेसळ विभागालाच माहिती. कारण, हा विभाग कधीच भेसळ, कारपेटद्वारे फळ पिकविणे, असे प्रकार उघड करण्यात सातत्याने अपयशी ठरलेला आहे. त्यामुळे हे अन्न भेसळ व औषध प्रशासन विभाग केवळ नावालाच असल्याची टिका होत आहे.

## निम्न तेरणा धरणाचे दोन दरवाजे बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
निम्न तेरणा (माकणी धरण) प्रकल्पात तेरणा नदी पात्राद्वारे येणारे पाणी कमी झाल्याने रविवारी सकाळी अकरा वाजता दोन दरवाजे (द्वार क्र २ व १३) पूर्णपणे बंद करण्यात आली.
गेल्या चार दिवसांपासून पावसाने उसंत घेतल्याने नदी, नाले, ओढ्यांना वाहणारे पाणी कमी झाले. तसेच तेरणा नदीपात्रातील देखील पाणी कमी झाले. मागच्या चार दिवसांपासून तेरणा नदीपात्राद्वारे येणारे पाणी वेगवान होते. आता पावसाने उसंत घेतल्याने वाहत्या पाण्याचा वेग मंदावला असून, अतिरिक्त पाणीसाठा देखील मयदित आल्याने रविवारी सकाळी अकरा वाजता दोन दरवाजे बंद करण्यात आले. निम्न तेरणा धरण काटोकाट भरले असून, आता दरवाजे बंद करून पाणीसाठा कायम राहिल, याची काळजी घेण्यात येत आहे. पूर नियंत्रण कक्षाने निम्न तेरणा धरणाचे चालू असलेले दोन दरवाजे बंद करण्याचा निर्णय घेतला.

## सुटकेसमध्ये आढळला महिलेचा मृतदेह ; तपास सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
चाकूर-शेळगाव रस्त्यावर तिरु नदीच्या काठावर सुटकेसमध्ये अज्ञात महिलेचा मृतदेह आढळल्याची खळबळजनक घटना रविवारी सायंकाळी उघडकीस आली.
वाढवणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेळगाव (ता. चाकूर) येथे चाकूर-शेळगाव रस्त्यांवरील तिरु नदीवरील पुलाखाली सुटकेसमध्ये अज्ञात महिलेचा सडलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला आहे. याची माहिती पोलीसांनी मिळाल्यानंतर अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, वाढवणा पोलीस ठाण्याचे अधिकारी तसेच फॉरेन्सिकचे पथक दाखल झाले होते. रात्री उशिरापर्यंत महिलेची ओळख पटली नव्हती. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी चापोली येथील आरोग्य केंद्रात नेण्यात आला होता.

## गणेशोत्सवाची जिल्हाभरात लगबग

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
बैलपोळ्याचा सण साजरा होताच लातूर शहरासह जिल्हाभरात आता गणेशोत्सवाचे वेध लागले असून, जिल्ह्यात विविध ठिकाणी गणेशोत्सवाची जोरदार लगबग दिसून येत आहे. गणेशोत्सवासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस आणि महापालिका प्रशासनासह नगरपालिका, नगरपंचायती व ग्रामपंचायतींनी तयारी सुरू केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

गणेशोत्सव हा लहान-थोरांपासून सर्वांचाच आकर्षणाचा विषय आहे. यंदा २७ ऑगस्ट रोजी विघ्नहर्त्या गणरायाचे आगमन होणार आहे. यामुळे लाडक्या बाप्पांच्या आगमनाची सर्वांनाच आतुरता लागली आहे. बाप्पाच्या स्वागतासाठी घरोघरी तयारी केली जात आहे. बाजारपेठाही मूर्ती, सजावटीचे साहित्य, मिठाई यासारख्या अनेक गोष्टींनी सजली आहे. वेगवेगळ्या आकारांतील आकर्षक मूर्ती बाजारात पाहायला मिळत आहेत. दहा दिवस चालणारा गणपती उत्सव देशभरात जल्लोषात साजरा केला जातो. प्रत्येक घरात गणपती बाप्पांची स्थापना केली जाते आणि मनोभावे पूजा केली जाते. गणेशोत्सवादरम्यान विघ्नहर्त्याची मनोभावे पूजा केल्यास अनेक संकटांमधून सुटका होते.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लातूर शहरामध्ये अनेक मंडळांनी उत्सवाचे मंडप उभारणीस सुरुवात केली असून, अनेक महत्त्वाच्या मंडळांचे व गर्दीच्या ठिकाणचे मंडप उभारणीचे काम अद्याप सुरू झाले नाही. शहरात वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी अनेक मंडळांनी उत्सवाच्या एक-दोन दिवस अगोदर मंडप उभारणीचे काम करण्याचा निर्णय घेतला आहे. बाजारामध्ये गणेश मूर्तीच्या खरेदीसाठी गर्दी होत असून, मंडळांसाठी लागणाऱ्या मोठ्या मूर्ती रंगविण्याचे काम कारागिरांकडून अखेरच्या टप्प्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाने परिसर स्वच्छतेच्या कामाला प्राधान्य दिले असून, शहरात अनेक ठिकाणी स्वच्छतेची मोहीम राबविली जात आहे. दरम्यान, उत्सव शांततेत पार पाडावा यासाठी पोलीस प्रशासनाने प्रत्येक पोलीस ठाण्याच्या अंतर्गत शांतता समित्यांच्या बैठका घेतल्या असून, सर्वांना एकोप्याने उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे.



## ई-पीक नोंदणी ठरतेय डोकेदुखी

### शेतकऱ्यांना ॲप हाताळता येईना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाऊन ई-पीक नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, शासनाने उपलब्ध करून दिलेला ई-पीक पाहणी 'डीएसी' हा ॲप बहुतांश शेतकऱ्यांना हाताळता येत नसल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.



प्रधानमंत्री पीक योजनेसह अन्य नुकसान भरपाई मिळविण्यासाठी शासनाने मागील तीन वर्षांपासून खरीप व रबी हंगामात लागवड केलेल्या पिकांची ई-पीक पाहणी बंधनकारक केली आहे. यंदा खरीप हंगामात लागवड केलेल्या पिकांच्या ई-पीक पाहणीच्या नोंदी अभियानास १४ ऑगस्टपासून प्रारंभ झाला असून, १४ सप्टेंबरपर्यंत अंतिम नोंदणीची मुदत दिली आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील शेतकरी दररोज शेतात ई-पीक पाहणी करण्यासाठी मोबाइल ॲपशी झटत आहेत. पण, सदरील ॲप सुरु होण्यास तासन्तास लागत आहेत.

स्वतःच्या शेतात उभे राहून ई-पीक नोंदणी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांना ॲप व्यवस्थित न उघडणे, इंटरनेट स्लो असल्याने सतत लोडिंग, ऑनलाइन प्रक्रिया समजण्यात अडचणी अशा अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे.

गूगल मॅपमध्ये शेतापासून, गट नंबर किंवा सर्वे नंबरपासून दूर दाखविले जात आहे. त्यामुळे त्या शेताची नोंदणी पूर्ण होत नाही. प्रधानमंत्री पीक विमा योजना ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी, दिल्ली मार्फत राबवली जात आहे. मात्र, या तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना विम्याचा लाभ वेळेत मिळण्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. या सर्व अडचणींमुळे ई-पीक नोंदणी वेळेत पूर्ण न झाल्यास पीक विम्यापासून वंचित राहण्याची शक्यता असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. शेतकरी बांधवांनी वेळेवर ई-पीक पाहणी पूर्ण न केल्यास मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे शासनाने तातडीने सोपी व सुलभ पध्दत उपलब्ध करून द्यावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

### सर्व्हर डाऊनमुळे अडचण

खरीप हंगाम २०२५-२६ साठी ऑनलाइन पध्दतीने पीक नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. इंटरनेटची कमी गती, ॲपमध्ये वारंवार येणाऱ्या तांत्रिक अडचणी आणि आवश्यक प्रशिक्षणाचा अभाव यामुळे शेतकऱ्यांचे नोंदणी काम रखडत आहे. प्रत्यक्षात संध्याकाळी सहा वाजेनंतर हे ॲप काम करणे बंद करते आणि सकाळी सहा वाजेनंतरच सुरू होते. सर्व्हरवर प्रचंड लोड असल्यामुळे शेतकऱ्यांना नोंदणी करणे अत्यंत अवघड जात आहे.

## लातूर इस्कॉनतर्फे बालगोपाळांना पारितोषिक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
इस्कॉन लातूरतर्फे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सवानिमित्त बालगोपाळांच्या विविध कलागुणांना वाव देण्याच्या हेतूने स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेचे पारितोषिक वितरण शनिवार, दि. २४ ऑगस्ट रोजी जिल्हा न्यायाधीश पी. पी. किस्तीकर आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. इस्कॉन लातूरतर्फे मालिनी माताजी आणि श्रीनिवास प्रिय प्रभुजी उपस्थित होते.

यावेळी इस्कॉनतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी सामाजिक उपक्रमांची माहिती देण्यात आली. बालगोपाळांना संस्कारक्षम करणाऱ्या आणि विविध मूल्यांची जपवणूक करणाऱ्या उपक्रमाबद्दल जिल्हा न्यायाधीश किस्तीकर आणि तहसीलदार तांदळे यांनी प्रशंसा केली.

यावेळी जिल्हा न्यायाधीश किस्तीकर म्हणाले, अशा प्रकारचे प्रशिक्षण बालकांना या वयात मिळाले तर नक्कीच मोठेपणी ते कायद्याचे काटेकोरपणे पालन करणारे जबाबदार नागरिक घडतील.

तसेच तहसीलदार तांदळे म्हणाले, सध्या फक्त सुशिक्षित नागरिक न घडविता सुसंस्कारक्षम नागरिक घडवणे गरजेचे आहे. इस्कॉनतर्फे मिळणाऱ्या प्रशिक्षणातून नक्कीच असे सुसंस्कारक्षम नागरिक घडतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या वेळी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## भरधाव कारने वृध्देस १५ कि.मी. फरफटत नेले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
भरधाव वेगातील एका इंडिका कारने कंधार तालुक्यातील डिग्रस येथे रस्त्याच्या कडेला थांबलेल्या एका ७० वर्षीय वृध्देस तब्बल १५ कि.मी. फरफटत नेल्याची धक्कादायक घटना रविवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास घडली असून, या महिलेचा मृतदेह जळकोट तालुक्यातील पाटोदा (खु.) येथे आढळून आला. या प्रकरणी जळकोट पोलीस ठाण्यात कारचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस फरार आरोपीचा शोध घेत आहेत.

पोलिसांनी सांगितले, बिदर जिल्ह्याच्या हुमनाबाद तालुक्यातील घाटबोरळ येथील ७० वर्षीय चिमाबाई विठ्ठलराव बाचीपळे ह्या नातेवाईकांसह रविवारी नांदेडच्या कंधार तालुक्यातील डिग्रस येथे भाच्याच्या लग्नाला जात होत्या. उलटी आल्याने चिमाबाई बाचीपळे ह्या दुपारी १ वाजेच्या सुमारास डिग्रस येथील एका शाळेच्या समोर रस्त्यावर थांबल्या होत्या. त्यावेळी नांदेडकडून भरधाव वेगाने येणाऱ्या इंडिका कार (एमएच ०३ ए झेड ८६७१) चालकाने चिमाबाई बाचीपळे यांना जोराची धडक देऊन फरफटत नेले.

चिमाबाई यांच्या नातेवाईकांनी त्या कारचा पाठलाग केला. मात्र, त्या कुठेच आढळून आल्या नाहीत. याची माहिती जळकोट पोलिसांना देण्यात आली.

## मनपाचा स्ट्राइक : ९५० किलो प्लास्टिक जप्त

### १ लाख ६५ हजार रुपये दंडाची वसुली शहरातील १८ प्रभागात एकाच वेळी कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने गेल्या काही दिवसात प्लास्टिक विरोधात जप्तीची मोहीम राबविण्यात येत आहे. रविवारीही मोहीम सुरू होती. या अंतर्गत शहरातील १८ प्रभागात एकाच वेळी धाडी टाकून ९५० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. प्लास्टिक वापरणाऱ्यांकडून १ लाख ६५ हजार रुपयांचा दंडही वसूल करण्यात आला.



मनपाच्या स्वच्छता विभागाच्या वतीने गेल्या काही दिवसांपासून शहरात बंदी असणाऱ्या सिंगल युज प्लास्टिक वापरा विरोधात मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत प्लास्टिक विक्री करणारे तसेच वापर करणाऱ्यावर कारवाई केली जात आहे. या मोहिमेत आतापर्यंत मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

या मोहिमेला गती देण्यासाठी मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहरातील १८ प्रभागात एकाच वेळी प्लास्टिक जप्ती मोहीम राबविण्याचे आदेश दिले. त्यानुसार प्रत्येक प्रभागात एक अधिकारी व स्वच्छता निरीक्षक आणि त्यांच्या सोबतीला सात ते आठ कर्मचारी असे गट करून जप्तीची मोहीम राबविण्यात आली. पालिका उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी या मोहिमेचे नियोजन करत कारवाईला अंतिम रूप दिले. एकाच वेळी शहराच्या विविध भागात प्लास्टिक विक्रेत्यावर धाडी पडल्या. यात ९५० किलो प्लास्टिक पालिकेने जप्त केले.संबंधितांना १ लाख ६५ हजार रुपयांचा दंड करण्यात आला. सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणाची मोठी हानी होते. शासनाकडून अशा प्लास्टिकवर बंदी घालण्यात आलेली आहे. त्यामुळे नागरिकांनी या प्लास्टिक ऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करून पर्यावरण रक्षणास मदत करावी, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## लेखिका ज्योती भारती राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
येथील गोसावी समाज प्रतिष्ठानच्यावतीने शनिवारी आयोजित कार्यक्रमात साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ज्योती हनुमंत भारती यांना राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार विविध मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिलीप सागर होते. उद्घाटक म्हणून ज्येष्ठ पत्रकार सुखदेव गिरी, कोल्हापूर तर प्रमुख पाहुणे म्हणून युवा वक्ते अविनाश भारती, स्वप्नील भारती, परभणी, योगेश बन, छत्रपती संभाजीनगर, ओमप्रकाश गिरी, बीड यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ज्योती हनुमंत भारती यांना राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच शैक्षणिक, आरोग्य, उद्योग, शेती व महिला सक्षमीकरण या क्षेत्रातील डॉ. भागीरथी गिरी, डॉ. विवेकानंद गिरी, गणेश गोसावी, राहुल बावा, राहुल गिरी, सुरेश पुरी व दीपाली गिरी यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले.

स्त्रीची लेखणी धारदार झाली की, इतिहास बदलतो. समाजाच्या विकासासाठी आपल्या इतिहासातील पाळेमुळांना जोडून ठेवणे ही आजची खरी गरज आहे, असे सांगत ज्योती भारती यांनी हा सन्मान आपल्या आई, पती व सासरच्या मंडळींना अर्पण करत समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.

प्रास्ताविकात संयोजक अनिल पुरी म्हणाले, समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना एका मंचावर आणणे आणि त्यांच्या कार्याचा आदर्श समाजासमोर ठेवणे हेच प्रतिष्ठानचे ध्येय असून, हे व्यासपीठ गेली २८ वर्षे सातत्याने कार्यरत आहे. प्रत्येकाने विकास कार्याला हातभार लावल्यास समाजाची प्रगती होते. दुही मिटवून एकत्र येणे ही आपली जबाबदारी आहे, असे अविनाश भारती म्हणाले. यावेळी इयत्ता १० वी व १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरवही करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. जयमाला पुरी यांनी केले. आभार पूजा गिरी यांनी मानले.

## पर्यावरणपूरक गणपती बनवण्याची ज्ञानप्रकाशमध्ये कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ ऑगस्ट -**
मागील काही वर्षांपासून ज्ञानप्रकाश मध्ये पर्यावरणपूरक गणपती मुर्ती बनवण्याची कार्यशाळा घेतली जाते . दरवर्षी मोठ्या संख्येने पालक, विद्यार्थी यात सहभागी होतात .

यावर्षीची मुर्ती तयार करण्याची कार्यशाळा दि.२३ व २४ ऑगस्ट या दोन दिवसांमध्ये घेण्यात आली. या कार्यशाळेत ज्ञानप्रकाशची माजी विद्यार्थिनी इंटेरियर डिझायनर व आर्टिस्ट ,आर्किटेक्ट असलेली प्रा. साक्षी मल्लूरवारने लाल माती पासून गणपती बनवण्याचे प्रशिक्षण पालक आणि विद्यार्थ्यांना दिले. वेगवेगळ्या दोन गटातून पालकांसह लहान मुलेही यात उत्साहाने सहभागी झाली. या दोन दिवसांत जवळपास दोनशे गणपती मुर्ती तयार झाल्या . लाल माती पासून तयार हीच मुर्ती आता घराघरात स्थापन केली जाणार आहे .

स्वतःच्या हाताने बनवलेल्या श्रींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचा आनंद कार्यशाळेत सहभागी झालेले प्रत्येक जण व त्यांचे कुटुंबीय घेतील. कला शिक्षक जयराम मस्के, विभाग प्रमुख माधवी मिरजकर, प्रकाश टिमके , प्रदिप शिंदे आणि इतर शिक्षकांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# एमजीएम विद्यापीठ आणि कोप्पल विद्यापीठात सामंजस्य करार

## शैक्षणिक सहकार्य आणि संशोधनासाठी महत्त्वपूर्ण भागीदारी



छत्रपती संभाजीनगर, दि. २५ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि कर्नाटक राज्यातील कोप्पल विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात नवकल्पना, संशोधन व सहकार्य यांना चालना देणारा हा करार दोन्ही संस्थांसाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये सामंजस्य करारावर कोप्पल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.बी.के.रवी आणि एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या करारामध्ये शैक्षणिक देवाणघेवाण, संयुक्त उपक्रम, भाषा विकास, प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि संशोधन प्रकल्प राबवण्यावर भर देण्यात आला आहे. या सामंजस्य कराराच्यावेळी कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.एच.एच.शिंदे, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, डॉ.प्राप्ती देशमुख, अधिष्ठाता जॉन चेल्लादुराई, अधिष्ठाता डॉ. रणीत किशोर, प्राचार्या डॉ. विजया मुसांडे, उपकुलसचिव डॉ.परमिंदर कौर, संचालिका डॉ.शर्वरी तामणे, संचालिका शुभा महाजन, जनसंपर्क अधिकारी श्रीकांत येरुळे व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

करारानुसार दोन्ही विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांचे आणि प्राध्यापकांचे आदानप्रदान, संयुक्त कार्यशाळा व परिषदा, स्टार्टअप व इनोव्हेशन उपक्रम, कौशल्य व प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. विशेषतः विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व करिअरच्या संधी देण्यासाठी या कराराचा उपयोग होणार आहे. यामुळे दोन्ही विद्यापीठांचे शैक्षणिक पातळीवरील सहकार्य अधिक सशक्त होईल आणि विविध उपक्रम येत्या काळामध्ये हाती घेता येणार आहेत.

# आईच्या कष्टातून घडलेलं यश; १६व्या वर्षीच मुलाने वडिलांचे स्वप्न पूर्ण केले



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : वडिलांचे छत्र हरपल्यावर आईच्या कष्टावर घर चालविणारा आणि आईला मेसचे डबे वाटण्यात मदत करणारा मुलगा आज स्वतःच्या जिद्दीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव कमावत आहे. छत्रपती संभाजीनगर येथील नील धीरजकुमार चुडिवाल (जैन) या १६ वर्षीय विद्यार्थ्याने ऑनलाईन कोडिंग स्पर्धेत देशभरातून दुसरा क्रमांक पटकावत आपल्या दिवंगत वडिलांचे स्वप्न पूर्ण केले. नील श्री संताजी ज्युनियर कॉलेजमध्ये अकरावीचे शिक्षण घेत आहे. वडिलांच्या निधनानंतर त्याच्या आईने मेसचे डबे पुरवून घराचा खर्च भागवला. आईच्या संघर्षमय जीवनाला आधार देत, स्वतःचे शिक्षण आणि स्वप्न यांची सांगड घालण्याची धडपड नील करत राहिला. ऑनलाईन स्वरूपात झालेल्या या स्पर्धेत देशभरातील हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. नीलने आपल्या अभ्यासू वृत्ती व कठोर परिश्रमाच्या जोरावर दुसरा क्रमांक पटकावला. या कामगिरीबद्दल त्याला गुगलच्या अधिकृत संकेतस्थळावरून गौरवपत्र देण्यात आले असून त्यावर गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई यांची स्वाक्षरी आहे. आईची धडपड पाहून मी शिक्षणात काहीतरी मोठं करून दाखवायचं ठरवलं होतं. आज मिळालेलं यश म्हणजे माझ्या आईवडिलांना वाहिलेली खरी श्रद्धांजली आहे, असे नीलने भावनिक शब्दांत व्यक्त केले. या यशाबद्दल नीलचे विविध स्तरावरून कौतुक होत आहे. संताजी ज्युनियर कॉलेजचे शिक्षक, मित्रपरिवार आणि स्थानिक नागरिकांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, आईच्या कष्टातून घडलेल्या या कामगिरीने समाजात प्रेरणा निर्माण केली आहे.

## 'सीडीएसएल आयपीएफ'कडून जागरूकता उपक्रमाचे आयोजन

जालना : सीडीएसएल इन्व्हेस्टर प्रोटेक्शन फंडातर्फे (सीडीएसएल आयपीएफ) 'एम्पॉवरिंग अवर प्रोटेक्टर्स' या प्रमुख उपक्रमांतर्गत जालना येथील मुख्य पोलीस प्रशिक्षण केंद्रात गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम यशस्वीपणे घेण्यात आला. पोलीस कर्मचारी, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आर्थिक साक्षरता वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.या प्रसंगी तज्ज्ञांनी महत्त्वाच्या आर्थिक संकल्पना प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सोप्या भाषेत स्पष्ट केल्या. त्यामुळे उपस्थितांना विषय अधिक नेटकेपणाने समजला. विविध क्षेत्रांतील व्यक्तींना सुजाण गुंतवणूक निर्णय घेण्यासाठी आवश्यक ज्ञान व साधने उपलब्ध करून देणे, आर्थिक स्वावलंबनाची जाणीव त्यांच्यात निर्माण करणे आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत योगदान देणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते. गुंतवणुकीची मूलभूत तत्त्वे तसेच गुंतवणुकीसंदर्भात फसवणुकीपासून संरक्षण या विषयांवर सविस्तर चर्चा कार्यक्रमात करण्यात आली.

## 'एम्पॉवरिंग अवर प्रोटेक्टर्स' या गुंतवणूक जागरूकता उपक्रमाचे आयोजन

लातूर: 'सीडीएसएल इन्व्हेस्टर प्रोटेक्शन फंडा'तर्फे (सीडीएसएल आयपीएफ) 'एम्पॉवरिंग अवर प्रोटेक्टर्स' या उपक्रमांतर्गत लातूर येथील बाभळगाव पोलीस प्रशिक्षण केंद्रात गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात आले.सशस्त्र दलातील जवान, पोलीस कर्मचारी, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांना गुंतवणूक सजग निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, आर्थिक स्वावलंबनाची जाणीव त्यांच्यात वाढवणे आणि आत्मनिर्भर भारत घडविण्यात त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

## पुण्यात स्टुडिओ डीएनए चं नवं स्टुडिओ

पुणे – ऑफिस डिझाईन आणि प्रोजेक्ट मॅनेजमेंटमध्ये काम करणारी स्टुडिओ डीएनए कंपनी आता पुण्यातील नव्या, मोठ्या आणि अधिक आधुनिक स्टुडिओमधून कार्यरत होणार आहे. हा बदल फक्त जागेपुरता नाही, तर कंपनीच्या वाढीचा आणि नव्या संकल्पनांचा टप्पा आहे.उद्घाटन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून विक्रम इन्फ्राटेक डेव्हलपर्स प्रा. लि. चे चेअरमन विक्रम गायकवाड उपस्थित होते. स्टुडिओ डीएनए आणि गायकवाड यांचं सहकार्य २० वर्षांहून अधिक काळ टिकून आहे. पुणे मेट्रोसह अनेक मोठ्या निवासी आणि औद्योगिक प्रकल्पांमध्ये गायकवाड यांचं योगदान आहे.

## कार्टुन नेटवर्क आणि पोगोतर्फे स्कूल कॉण्टॅक्ट प्रोग्रामचे १८वे पर्व सादर

मुंबई : कार्टुन नेटवर्क आणि पोगोने अत्यंत अभिमानाने त्यांच्या स्कूल कॉण्टॅक्ट प्रोग्राम (एससीपी)च्या १८ व्या पर्वाची घोषणा केली आहे. भारतातील शाळांच्या माध्यमातून सर्वाधिक परिणाम साधणारा आणि सर्वात मोठ्या स्तरावरील हा एक उपक्रम आहे. १७ शहरांमधील १४०० शाळांमधील दहा लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या उद्दिष्टासह या पर्वातही अर्थपूर्ण अनुभवांसह लहान विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचा आणि त्यांना सक्षम बनवण्याचा वारसा जपला जाणार आहे.

## चुडामन सोनवणे यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२५ ऑगस्ट – तालुक्यातील माळेगाव (पिंपरी) येथील चुडामण दोलत सोनवणे (वय–७५) यांचे दुपारी एक वाजता निधन झाले. त्यांच्यावर रविवारी सायंकाळी सहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली, सुना,नातवंडे असा परिवार आहे.माळेगाव पिंपरी येथील उपसरपंच सुनिताबाई जाधव यांचे ते वडील होते.

# गहाळ मोबाईल शोधून मूळ मालकांना परत – सपोनि कुणाल सुर्यवंशी

## २०२४ -२०२५ च्या कालावधीत तब्बल ९३ लाखांचे गहाळ मोबाईल केले परत

तभा वृत्तसेवा

कन्नड :– दि.२५ ऑगस्ट – कन्नड शहर पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या तक्रारदारांनी हरविलेल्या मोबाईलची तक्रार नोंदवली होती. या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करताना सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी व पोलीस शिपाई विजय चौधरी यांनी तांत्रिक तपास करून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून तब्बल १२ गहाळ मोबाईल हस्तगत केले. यांची एकूण किंमत २ लाख रुपयांपेक्षा जास्त असून, दि. २३ ऑगस्ट रोजी हे मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले.

यापूर्वीही सपोनि कुणाल सुर्यवंशी यांनी फेब्रुवारी २०२४ पासून आजतागायत केलेल्या कारवाईतून तब्बल १५ लाख रुपयांपेक्षा जास्त किंमतीचे ९३ मोबाईल मूळ मालकांना परत करण्यात यश मिळाले आहे. ही कामगिरी कन्नड शहर पोलीस ठाण्याचीच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील नागरिकांसाठी विश्वास निर्माण करणारी ठरली आहे.

मोबाईल परत मिळाल्यानंतर अनेक तक्रारदारांनी समाधान व्यक्त करताना सांगितले की, आजवर हरवलेले मोबाईल परत मिळतील अशी आशाच नव्हती, पण कन्नड पोलिसांनी विशेषतः सपोनि कुणाल सुर्यवंशी यांनी घेतलेली मेहनत आणि प्रामाणिक प्रयत्न यामुळे आम्हाला आमचा हक्काचा माल परत



मिळाला.अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिल्या आहे

यावेळी नागरिकांनी सुर्यवंशी यांच्या कामाची मनापासून प्रशंसा करत त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पोलिस दलातील युवा अधिकारी म्हणून त्यांनी नागरिकांच्या अपेक्षांना न्याय दिल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या कार्यवाहीत पोलीस अधीक्षक डॉ. विनायकुमार राठोड यांचे मार्गदर्शन, पोनि आर. बी. सानप यांच्या मार्गदर्शनाखाली, सपोनि कुणाल सुर्यवंशी व पोलिस शिपाई विजय चौधरी यांचा विशेष सहभाग होता.

यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी यांनी नागरिकांना आवाहन केले की, मोबाईल व इतर किमती वस्तू प्रवासात व दैनंदिन वापरात सुरक्षित ठेवा. काळजी घेतल्यास अशा घटना टाळता येतील.

कन्नड पोलिसांच्या या कार्यवाहीमुळे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की नागरिकांच्या अडचणींना न्याय देण्यासाठी पोलीस सदैव तत्पर आहेत.

माझा मोबाईल हरवल्यानंतर परत मिळेल असं वाटलंच नव्हतं. पण कन्नड पोलिसांनी, विशेषतः सुर्यवंशी सरांनी जी मेहनत घेतली, त्यामुळे आज मोबाईल हातात आहे. त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत.

–सचिन एकनाथ चव्हाण, आंबतांडा तक्रारदार

आज मोबाईल परत मिळाला आणि जणू आपले घरचं हरवलेलं दागिनंच परत मिळाल्यासारखं समाधान झालं. कन्नड पोलिसांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.

– दिलीप वामनराव भोसले, रा. वडाळी कन्नड, तक्रारदार

पोलीस आमच्यासाठी एवढं काम करतील असं वाटलं नव्हतं. सुर्यवंशी सर खरोखरच तरुणांसाठी आदर्श ठरत आहेत. त्यांच्या धडपडीमुळे आमचं नुकसान वाचलं.

– तक्रारदार अनुप पांडुरंग परदेशी शनिमंदिर कन्नड

# ई–पिक पाहणी ॲप ठप्प; शेतकऱ्यांचा मनस्ताप वाढला

तभा वृत्तसेवा

पिशोर : दि २५ ऑगस्ट – महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ई–पिक पाहणी प्रकल्पाला तांत्रिक अडथळ्यांचा मोठा फटका बसला आहे. मोबाईल पवर माहिती भरताना सर्व्हर वारंवार डाऊन होत असल्याने पिकांची नोंदणी अपूर्ण राहते. परिणामी शेतकऱ्यांचा त्रास वाढला असून, अनेकांनी या प्रक्रियेबाबत उदासीनता दाखवण्यास सुरुवात केली आहे.

गेल्या दोन वर्षांपासून माझी शेती, माझा सातबारा, मीच करीन माझा पीक पेरा या घोषवाक्याच्या आधारे हा प्रकल्प राज्यभर सुरू झाला. प्रारंभी शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. मात्र अलीकडे प सतत ठप्प पडत असल्याने शेतकऱ्यांना तासन्तास प्रतीक्षा करूनही नोंदणी करणे शक्य होत नाही. खरीप हंगामातील अनेक शेतकऱ्यांची नोंदणी अद्याप प्रलंबित आहे.

पिक पाहणी प्रक्रियेत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात जाऊन लोकेशनसह पिकाचा फोटो घेऊन पमध्ये माहिती अपलोड करावी लागते. परंतु एकाच वेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी नोंदणी करताच प बंद पडते. प डिलीट करून पुन्हा डाउनलोड केल्यानंतरही समस्या कायम असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. याशिवाय, अनेक शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन किंवा पुरेसे नेटवर्क नसल्यानेही नोंदणी करण्यात अडचणी येत आहेत.

काही शेतकऱ्यांनी लेखी स्वरूपात तक्रारी केल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अहवाल पाठवून पुढील उपाययोजना करता येतील, असे खातखेडा–साखरवेल येथील तलाठी निलेश गवळी यांनी सांगितले.

ॲप व्यवस्थित न चालल्याने शेतकरी प्रतिसाद देत नाहीत. संबंधितांनी तातडीने पमध्ये सुधारणा करून ही समस्या दूर करावी, जेणेकरून भविष्यात अडचणी निर्माण होणार नाहीत, असे मत साखरवेल येथील शेतकरी बाबासाहेब घुगे यांनी व्यक्त केले.

# चापानेर येथे सदभावना दिनानिमित्त निबंध स्पर्धा व वृक्षारोपण कार्यक्रम



तभा वृत्तसेवा

कन्नड – स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांच्या ८०व्या जयंतीनिमित्त तालुक्यातील चापानेर येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत सद्भावना दिनानिमित्त निबंध स्पर्धा व वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. नेहरू युवा केंद्र छत्रपती संभाजीनगर व शाश्वत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, चापानेर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चापानेर ग्रामपंचायतचे सरपंच बाबुराव सातदिवे होते. ग्रामविकास अधिकारी पगारे, शाळेचे मुख्याध्यापक भोईर, तसेच गावातील मान्यवर उपस्थित होते. स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यानंतर निबंध स्पर्धा घेण्यात आली. एक मूल एक झाड, वृक्षसंवर्धन – काळाची गरज व स्व. राजीव गांधी यांचे आधुनिक विचार या विषयांवर १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विजेत्यांना टिफिन बॉक्स व दैनंदिन गरजेच्या वस्तूंची बक्षिसे देण्यात आली.

या कार्यक्रमात शाश्वत बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव अतुल दाडबळे यांनी संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की, आरोग्यसेवा, हरित गाव, स्वच्छता मोहिम, पाणी संवर्धन, कौशल्य प्रशिक्षण व लघुउद्योग निर्मिती या संकल्पनांवर संस्था पुढील दहा वर्षे सातत्याने काम करणार आहे. गाव विकासात प्रत्येक नागरिकाची सक्रीय भूमिका महत्त्वाची असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमात ग्रामपंचायतीने संस्थेला सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. तसेच या उपक्रमासाठी रोटरी क्लब, छत्रपती संभाजीनगरचे चंद्रकांत चौधरी यांनी आर्थिक मदत दिली.

वृक्षारोपण उपक्रमाने कार्यक्रमाची सांगता झाली. सद्भावना दिनानिमित्त घेण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जाणीव जागृती घडविण्यात आली.

# विष्णू मापारी यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२५ ऑगस्ट

सोयगाव नाट्यपंढरीचे वारकरी समाज प्रबोधनकार लोककलावंत विष्णू विनायकराव मापारी सोयगावकर यांना ते करीत असलेल्या सांस्कृतिक,सामाजिक,शैक्षणिक, धार्मिक कार्याची दखल घेत मराठी साहित्य मंडळ ठाणे ने त्यांना राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले पुरस्कार जाहीर केला आहे.वर्षा थोरात महाराष्ट्र प्रदेश सचिव मराठी साहित्य मंडळ यांनी मापारी यांना तसे कळविले आहे.

ठाणे जिल्ह्यामधील भिवंडी तालुक्यातील कोन गावामध्ये होणाऱ्या चौदावे आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सदरील पुरस्कार दि.५ ऑक्टोबर २०२५ रविवारी प्रदान करण्यात येणार आहे.समाज प्रबोधनकार विष्णू मापारी सोयगावकर यांना राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल तालुका खरेदी विकास संघ व कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक तथा भैरवनाथ पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर (आबा) काळे,नगराध्यक्षा आशाबी तडवी,उपनगराध्यक्षा सुरेखाताई काळे,गटनेता अक्षय काळे,भाजपा जेष्ठ नेते माजी नगराध्यक्ष कैलास काळे,सोयगाव भाजपा शहराध्यक्ष मंगेश सोहनी,तालुका खरेदी संघ संचालक मयूर मनगटे,भाजपा उपतालुका अध्यक्ष योगेश पाटील,तालुका कॉंग्रेस कमेटी अध्यक्ष राजेंद्र काळे,राष्ट्रवादी कॉंग्रेस सोयगाव शहराध्यक्ष रवींद्र काळे,नगरसेविका संध्याताई किशोर मापारी,राजू दुतोंडे,दीपक पगारे,आरोग्यदूत दिगंबर वाघ,कृषिभूषण अरुण सोहनी,समाजसेवक संजय शहापूरकर,किशोर मापारी,आमोल मापारी, ह.भ.प.सुधन्वा महाराज केणेकर, पत्रकार मित्र यांनी अभिनंदन केले.

# पारंपारिक शिक्षणासोबत कौशल्याभिमुख शिक्षणाची जोड महत्त्वाची – डॉ.दिलीप बिरुटे



तभा.वृत्तसेव

सोयगाव,दि.२५ ऑगस्ट

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्यापीठाचा ध्वज फडकावण्यात आला.यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ.दिलीप बिरुटे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.त्यांनी विद्यापीठाच्या स्थापनेच्या इतिहासापासून सद्यस्थितीपर्यंतचा आढावा घेतला.बदलत्या काळानुसार शिक्षणात होणाऱ्या बदलांवर भाष्य करताना त्यांनी पारंपारिक शिक्षणासोबतच कौशल्याभिमुख शिक्षणाची जोड महत्त्वाची असून विद्यार्थ्यांनी याचा स्वीकार करणे गरजेचे आहेअसे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी भूषविले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे व आयक्यूएसी समन्वयक डॉ.प्रमोद पवार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.निलेश गावडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.संतोष तांदळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ.निलेश गावडे,डॉ. पंकज गावित,डॉ.सुनील चौधरे,कुणाल गव्हाणे व हुसरे यांनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पर्युषण पर्व निमित्त १० दिवसांचे भव्य कार्यक्रम आयोजित



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – श्री १००८ मल्लीनाथ दिगंबर जैन मंदिर, देशमुखनगर येथे प.पू. आचार्य समाधी सम्राट विरागसागरजी महाराजांचे प्रभावक शिष्य, प.पू. पट्टाचार्य विशुद्धसागरजी महाराजांचे आज्ञानुवर्ती शिष्य प.पू. उपाध्याय १०८ विरंजनसागरजी महाराज, मुनिश्री विनीशोधसागरजी महाराज, मुनिश्री विसौम्यसागरजी महाराज तसेच शुल्लिका विशिलाश्री माताजी ससंघ यांचा चातुर्मास सुरू आहे. हा संघ जबलपूर येथून देशमुखनगर येथे आला असून महाराजांच्या सानिध्यात दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होत आहे. जैन धर्मीयांचे महापर्व पर्युषण २८ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. यासाठी १० दिवसांचे भव्य कार्यक्रम आखण्यात आले असून याची माहिती आज पत्रकार परिषदेत देण्यात आली.

कार्यक्रमाचा प्रारंभ २६ ऑगस्टला रोठतीज आणि घटयात्रेने होईल. सकाळी ७ वाजता समाजबंधूंच्या उपस्थितीत बँड पथकासह भव्य शोभायात्रा काढण्यात येईल. यावेळी सौधर्म इंद्र–इंद्राणी यांची निवड देखील करण्यात येईल. या १० दिवसांत सर्व जैन धर्मीय धार्मिक साधना, पूजन व व्रतांचे पालन करतात. याला दशलक्षण पर्व असेही म्हटले जाते. जीवनभर या व्रतांचे पालन करण्यासाठी त्यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

या प्रसंगी समाजबंधूंना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पर्युषण महापर्व व छत्रपती संभाजीनगर येथे प्रथमच आयोजित होणाऱ्या तत्वार्थ सूत्र मंडळ विधानाचा लाभ घ्यावा. यासाठी हजारांहून अधिक श्रद्धाळूंसाठी व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व कार्यक्रम भगवान मल्लीनाथ देशना मंडळ, देशमुखनगर, शिवाजीनगर येथे पार पडणार आहेत.

# मराठा आरक्षणासाठी खुलताबाद येथून छत्रपती शिवरायांचे स्मारक अंतरवेली सराटीकडे झाले रवाना



खुलताबाद प्रतिनिधी –संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेला मराठा आरक्षण लढा यामध्ये ऐतिहासिक खुलताबाद तालुक्याचा सुरुवाती पासूनच मोठा सहभाग आहे.

दिनांक २७ तारखेला अंतरवेली सराटी येथून करोडो समाज बांधव मनोज दादा जरांगे यांच्या नेतृत्वाखाली २९ तारखेला आझाद मैदानावर आरक्षणाच्या मागणीसाठी मार्गस्थ होणार आहे. या ऐतिहासिक प्रसंगी खुलताबाद तालुक्यामधून पुन्हा एकदा छत्रपती शिवरायांची पवित्र स्मारक स्थापित असलेला अनोखा रथ त्याची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहे छत्रपती शिवरायांची अश्वारूढ मूर्ती ज्याची उंची १२ फूट लांबी पंधरा फूट आहे आणि प्रवास लांबचा असल्यामुळे आयशर गाडीवर स्थापित केले आहे सूचनेसाठी या गाडीवर अद्यावत अशी साऊंड सिस्टम आहे लाईटच्या व्यवस्थेसाठी जनरेटर बसवलेला आहे दिनांक २७ तारखेला गणपतीची स्थापना होणार असल्यामुळे या गाडीवर गणपती साठी छोटे स्टेज सुद्धा बनवलेले आहे राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व संकल्पनेतून तयार झालेला हा रथ याचा सारथ्य खुलताबाद तालुक्याचे मराठा आरक्षण सेवक राजूभाऊ चव्हाण करणार असून रथावरून योग्य त्या सूचना माईक वरून देण्यासाठी गणपतराव मस्के पूर्ण रॅलीमध्ये उपस्थित राहणार आहे साऊंड सिस्टिम ची जबाबदारी शेवटपर्यंत पार पडण्यासाठी अमोल काकडे पाटील व आयशर गाडीचं रूपांतर रथामध्ये करण्यासाठी धुमाळ डीजे बॉडी बिल्डर या सर्वांनी विशेष मेहनत घेतली असून नियोजनाच्या दृष्टीने आज हे स्मारक भद्रा मारुतीचे साक्षीने खुलताबाद तालुक्यातील अनेक शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये राजेंद्र पवार यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून हा रथ अंतरवेली सराटीकडे रवाना करण्यात आला दिनांक २७ तारखेला खुलताबाद तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी लाखोच्या संख्येने सहभागी व्हावे अशी आवाहन संघर्ष योद्धा माननीय मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वतीने राजेंद्र पवार यांनी केले

# समीक्षा सिरसाट चे नीट परीक्षेत घवघवीत यश



पैठण दि २५ :– समीक्षा एक सर्वसामान्य कुटुंबातील सह.शिक्षक जालिंदर सिरसाट व साखरबाई सिरसाट यांची कन्या असून नांदेड येथून नीट परीक्षेची तयारी करून तिने परीक्षेत ४८५ गुण प्राप्त करून शासकीय कोट्यातुन एस.एम.बी.टी.वैद्यकीय महाविद्यालय नाशिक येथे एम बी बी एस साठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने शॉल व पुष्पगुच्छ देऊन पालकासह समीक्षा जालिंदर सिरसाट हिचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी पैठण जि.प.स्वीकृत सदस्य बळीराम पाटील भुमरे,महा. राज्य प्राथमिक शिक्षक संघ तालुका अध्यक्ष योगेश्वर शिसोदे,सरचिटणीस समशेर पठाण,कार्याध्यक्ष नारायण बहिर,तालुका सुभाष गोरे, संतोष डोळे,उपाध्यक्ष कैलास गायकवाड,जेष्ठ किशोर झोटे,जिल्हा शमीम पठाण,अशोक भाग्यवंत, संपर्क प्रमुख मयूर सिसोदे, तालुका विठ्ठल पांढरे, उपअध्यक्ष बाबासाहेब बडे, शहरअध्यक्ष आहेमद शेख, कार्यकारी अध्यक्ष जयसिंग खेडेकर,संगमेश्वर कोडते व शिक्षक संघांचे पदाधिकारी उपस्थित होते.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २५–०८–२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **सोनाली रमेश झिंजे** यांनी मोहल्ला **योगेश्वरी नगरी** सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट **क्र. ०२** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : १२ मिटरचा अंतर्गत रस्ता** **पश्चिम : ओपन स्पेस**
**दक्षिण : रविंद्र श्रावण चौधरी यांची बखळ प्लॉट जागा** **उत्तर : शिवाजी राजेंद्र बारी यांची बखळ प्लॉट जागा.**

आकार : पूर्व पश्चिम **१५७.२५ चौ.मी. = १६९२**चौ.फु. दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

## अग्रलेख...

# 'भाई-भाई'चा मोह नको

१९ व्या शतकात अमेरिका, रशिया आणि युरोपातील काही बडे देश वगळता ऑस्ट्रेलिया, आशिया, लॅटिन अमेरिका आणि आफ्रिका खंडातील जवळजवळ सर्वच देश युरोपियन देशांच्या गुलामगिरीत होते. ब्रिटिश, डच, पोर्तुगीज, फ्रेंचांनी सुमारे दोनशेपेक्षा जास्त वर्षे गरीब देशांचे रक्तशोषण करून तिजोऱ्या भरल्या. आज जे युरोपियन देश मानवतेच्या नावाने गळा काढत असतात त्यांच्याच पूर्वजांनी नाना तऱ्हेचे अत्याचार नागरिकांवर केले आहेत. जगाला लोकशाही मूल्ये, मानवतेचे धडे देण्याचा दावा करणाऱ्या ब्रिटिशांनी तर जवळपास ६५ देशांना गुलाम बनविले होते.

१८५७ पासूनच्या उठावानंतर भारतीयांनी गुलामगिरीचे जोखड झुगारण्यासाठी संघर्ष सुरू केला. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले पण जाता जाता ब्रिटिशांनी हिंदुस्थानच्या विभाजनाची बीजे पेरून ठेवली. तिबेट आणि ब्रह्मदेश (आताचा म्यानमार) हिंद भूमीपासून वेगळे केले. १८५७ च्या उठावात काडतुसाला गाय आणि डुकराची चरबी लावून देशाची हिंदू-मुस्लिमांमध्ये विभाजनाची सोय करून ठेवली होती. भारताचे जेवढे तुकडे होतील ते करण्याचे प्रयत्न केले. अगदी भारतातून काढता पाय घेत असताना विलियम ब्राऊन या लष्करी अधिकाऱ्याने जम्मू-काश्मीरचे तत्कालीन संस्थानिक महाराजा हरिसिंग यांच्याविरोधात उठाव करीत गिलगिट-बाल्टिस्तान पाकिस्तानात विलीन केले. म्हणजेच ज्या पाताळयंत्री, दृष्ट आणि कृतघ्न इंग्रजांनी ज्या ताटात खाल्ले त्या ताटालाच लाथ मारली. कारण, भविष्यात हिंदुस्थान चारही दिशांनी समस्यांनी घेरलेला असेल, याची काळजी घेतली. आज, जर गिलगिट-बाल्टिस्तान हा सामरिक आणि युद्धनीतीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा भूभाग प्रत्यक्ष हिंदुस्थानच्या ताब्यात असता तर आज सिल्क रूटवरून होणाऱ्या व्यापारात आपला वाटा सर्वाधिक असता. हिंदुस्थानचा माल, रेल्वे अथवा रस्तामार्गे थेट युरोपात पोहोचला असता. त्यामुळे आज अमेरिका, रशिया अथवा चीन नव्हे तर हिंदुस्थान जागतिक महासत्ता असता. इंग्रजांनी जे नुकसान करायचे होते ते तर केलेच पण आपल्या तत्कालीन नेतृत्वानेही घोडचुका केल्या, ज्याचे परिणाम आज आपण भोगतो आहोत. तिबेट, म्यानमार गमावून आपण पूर्वोत्तर तर गिलगिट-बाल्टिस्तानवर पाणी सोडून पश्चिमेचा मार्ग गमावला आहे. स्वातंत्र्यानंतर आपण ज्या परराष्ट्रनीतीचा अवलंब केला त्यामध्ये केवळ एकच मित्रदेश गवसला तो म्हणजे रशिया. याची प्रचीती आपल्याला पदोपदी येत आहे. जगातील सर्वांत मोठी आणि दीर्घकाळ चालणारी लोकशाही व्यवस्था असलेल्या हिंदुस्थानला अडचणीत आणण्याचे प्रयत्न अमेरिका, युरोपीय देश आणि चीन करीत आले आहेत. त्याला आपले शेजारी पाकिस्तान, नेपाळ, म्यानमार, बांगलादेश आणि श्रीलंका हे देश हातभार लावत असतात. यावरून एक बाब सिद्ध होते की व्यवहारी जगात सहिष्णुता, शांतता, मित्रता आदी मूल्यांना काडीचीही किंमत नाही. तसे नसते तर पाकिस्तानने पाचवेळा आक्रमण केलेच नसते.

कारगिल आणि पहलगामच्या घटना युद्धापेक्षा कमी नाहीत. भूभाग, लोकसंख्या, नैसर्गिक संसाधने आणि आर्थिक शक्तीचा विचार करता आसपासही नसणारा दरिद्री असलेला पाकिस्तान जर आपल्यावर पाचवेळा युद्ध लादत असेल तर यामध्ये चूक ही पाकिस्तानची नव्हे तर हिंदुस्थानचीच आहे. वारंवार दंश करून घायाळ करणाऱ्या पाकिस्तान नावाच्या विषारी नागाचा फणा ठेचून टाकण्याऐवजी आपण त्याला तसेच सोडून देण्याच्या चुका वारंवार केल्या आहेत. स्वातंत्र्य मिळून जवळपास आठ दशके होत आली आहेत. या काळात असे एकही दशक हिंदुस्थानच्या नशिबात आले नाही जिथे जनतेला सुख, शांती अनुभवायला मिळाली असेल. कदाचित प्रत्येकच दशकात बाह्य धोक्यांचा सामना करावा लागला नसेल पण अंतर्गत शत्रूंनी हिंदुस्थानला त्रासून सोडले. काश्मिरातील दहशतवाद, अतिपूर्वेतील सात राज्यांमधील बंडखोरी आणि धर्मांतरण, नक्षलवाद या अंतर्गत धोक्यांचा सामना करता करता देशाची शक्ती खर्ची पडली आणि आता अर्बन नक्षलवादाच्या रूपात उघडपणे न दिसणारा धोका पुढ्यात उभा ठाकला आहे. देशाच्या मुळावर घाव घालण्याचे कुटिल मनसुबे उघड उघड आखले जात आहेत. २०१४ नंतर केंद्रातील मोदी सरकारने अंतर्गत धोक्यांचा समर्थपणे सामना करीत देश आज जगातील तिसरी आर्थिक महासत्ता म्हणून पुढे आला आहे. पण, हिंदुस्थानची ही प्रगती अमेरिका आणि युरोपियन देशांच्या डोळ्यात सलते आहे. युक्रेन-रशिया युद्धाचा आधार घेत आशियातील चीननंतर दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याच्या उद्देशाने अमेरिका आणि युरोपियन देशांनी ५० टक्के व्यापार शुल्क लादले. रशियाकडून कच्चे तेल खरेदी न करण्याच्या धमक्या देत हिंदुस्थानला दबावात ठेवण्याची खेळी खेळली जात आहे. पण, एकीकडे रशिया अमेरिकेसह युरोपियन देशांच्या दबावाला ठोकरून लावत असल्याने डोनाल्ड ट्रम्प यांची इज्जत पार धुळीस मिळत आहे. रशियाकडून हिंदुस्थानपेक्षा अधिक तेल चीन खरेदी करतो पण ट्रम्प यांनी चीनला सूट दिली. कोरोना महामारीत जगातील अनेक देश आर्थिक संकटात सापडले असताना मोदी सरकारच्या आर्थिक धोरणामुळे हिंदुस्थानची अर्थव्यवस्था स्थिर राहिली. शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे दीर्घकालीन हित लक्षात ठेवून नरेंद्र मोदी यांनी अमेरिका आणि युरोपियन देशांचा दबाव झुगारून लावला. हिंदुस्थान आणि अमेरिका यांच्यातील संबंध २००८ पासून सुरळीत होण्यास प्रारंभ झाला. डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील यूपीए सरकारच्या काळात दोन्ही देशांमध्ये नागरी आण्विक करार झाला. व्यापारही सुरळीत झाला. सामरिक संबंध वाढले. बिल क्लिंटन, बराक ओबामा, डोनाल्ड ट्रम्प (पहिली कारकीर्द), ज्यो बायडेन या अध्यक्षांच्या कार्यकाळात दोन्ही देशांतील संबंध सर्वंकष दृष्टीने दृढ आणि मजबूत झाले. कठीण काळ हा खऱ्या मित्राची ओळख करून देत असतो. काही प्रसंगी मित्रालाही संतुलित धोरणाचा स्वीकार करावा लागतो. चीनसोबत २०१७ मधील डोकलाम आणि २०२० मधील गलवान संघर्षात अमेरिका आणि युरोपियन देशांनी उघडपणे हिंदुस्थानची बाजू घेतली तर चीनने तटस्थतेचे धोरण स्वीकारले होते. तर रशियन-युक्रेन युद्धात चीनने थेट रशियाच्या पाठीशी उभे असताना आपण कुणाचीही बाजू घेतली नाही. रशिया-युक्रेन युद्ध लांबत असल्याने आणि पुतिन यांच्या फौजांनी नाटो सदस्य देश हंगेरीच्या सीमेजवळ हल्ले चढवून थेट अमेरिका आणि युरोपियन देशांना आव्हान दिले. आर्थिक आणि संरक्षण मदत देऊनही गेल्या अडीच वर्षांपासून रशियाचे हल्ले सुरूच असल्याने नाटो देश आणि अमेरिका हतबल ठरले आहेत. आणि याचा ठपका हिंदुस्थान आणि चीनवर ठेवत डोनाल्ड ट्रम्प यांनी जबर व्यापारशुल्क आकारले. चीनची उत्पादन पुरवठा साखळी मजबूत आणि थेट अमेरिकन आणि युरोपियन नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारी असल्याने अमेरिकन अध्यक्षांनी चीनवर ३४ टक्के तर भारतावर सर्वाधिक ५० टक्के व्यापार शुल्क आकारले.

भारतीय अर्थव्यवस्था आणि जीवनाचा कणा असलेल्या कृषी आणि दुग्धोत्पादन बाजारपेठा खुल्या करण्यास नकार दिल्याने ट्रम्प यांनी पहिल्या टप्प्यात २५ तर रशियाकडून तेल खरेदी सुरू ठेवल्याने आणखी अतिरिक्त २५ टक्के व्यापारशुल्क लावले. पण, वर्तमान सरकारने ट्रम्प यांचा दबाव झुगारून लावला आणि देशाचे हित आणि ऊर्जाविषयक गरजा लक्षात ठेवून जेथे परवडणाऱ्या दरात उपलब्ध असलेले कच्चे तेल खरेदी करण्याची भूमिका घेतली. दुसरीकडे अमेरिकेच्या धोरणामुळे व्यापारात होणारी तूट भरून काढण्याचा प्रयत्न म्हणून चीनसोबतही व्यापाराला चालना देणे सुरू केले आहे. चीन आणि अमेरिका हे बेभरवशाचे सहकारी असले तरी काळाची गरज म्हणून हिंदुस्थानला चीनसोबत व्यापारी संबंध सुधारावे लागणार आहेत. तसे दोघेही अत्यंत घातकी, व्यवहारी आणि युद्धखोर आहेत. पण, शत्रूचा शत्रू तो आपला मित्र, या धोरणानुसार दिल्ली आणि बीजिंग यांना पावले टाकावी लागणार आहेत. सोबतच मोदी सरकारला 'हिंदी-चिनी भाई भाई'चा मोह टाळावा लागणार आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# आधार आता 'निराधार'?

निवडणूक आयोगाने बिहारमध्ये मतदारयाद्यांची तपासणी, छाननी करण्याचे काम चालविले आहे, जो आयोगाचा अधिकार आहे. आणि यात आधार कार्ड फक्त ओळखपत्र आहे, तो नागरिकत्वाचा पुरावा नाही असा युक्तिवाद आयोगाने केला तर सर्वोच्च न्यायालयाने आधार कार्डला महत्त्व देत, त्याचा स्वीकार आयोगाने करावा असे सुचविले. भारतात नागरिकांना अनेक प्रकारचे कार्ड दिले जात आहेत. यात निवडणूक आयोगाचे स्वतंत्र ओळखपत्र आहे, आयकर विभागाचे स्वतंत्र कार्ड आहे, काही वर्षांपासून त्यात आधारची भर पडली आहे. मात्र, प्रत्येक भारतीयासाठी नागरिकत्व कार्ड नाही. असे ओळखपत्र अस्तित्वातच नसल्याने बिहारची समस्या उभी ठाकली आहे.

**जन्म तारीख** : जगातील अनेक देशांमध्ये सर्वांत महत्त्वाचे व खात्रीशीर मानले जाणारे ओळखपत्र म्हणजे जन्मतारखेचा दाखला. आणि हा दाखला जन्माच्या दिवशीच तयार केला जातो. मुलाचा जन्म होताच, त्या दिवशी त्याचा वा तिचा जन्म दाखला तयार केला जातो, त्याला एक क्रमांक दिला जातो आणि हा क्रमांक संबंधिताचा मृत्यू होईपर्यंत कायम राहतो आणि त्याच्या नागरिकत्वाचा तो सर्वांत प्रमुख पुरावा मानला जातो. भारतात आजवर जन्मदाखला त्याच दिवशी तयार करण्याची सक्ती झालेली नाही आणि याचा परिणाम म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे बनावट दाखले तयार केले जात आहेत आणि केले जाणार आहेत.

**आधार की निराधार?** : बिहारमध्ये ६५ लाख मतदारांची नावे मतदारयाद्यांमधून वगळण्यात आली आहेत. यातील काही लाख मतदार कायमस्वरूपी दुसऱ्या राज्यात राहावयास गेले आहेत, काहींची नावे एकापेक्षा जास्त मतदारसंघात नोंदविली गेलेली आहेत तर काही लाख मतदार मृत झालेले आहेत. राज्यातील विधानसभा जागांचा विचार करता सरासरी २५ हजारावर मतदार एका मतदारसंघातून कमी करण्यात आले आहेत. नंतर यावर राजकीय वादंग सुरू झाले. संसदेचे कामकाज ठप्प झाले. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. येथे झालेल्या सुनावणीत आयोगाने आधार- नागरिकत्वासाठी 'निराधार' ठरविले. ते फक्त ओळखपत्र आहे अशी भूमिका आयोगाने घेतली आहे, जी सर्वोच्च न्यायालयाने अद्याप तरी स्वीकारलेली नाही. आधार नागरिकत्वाचा आधार नाही, आयकर विभागाचे पॅन कार्ड नागरिकत्वाचा आधार होऊ शकत नाही. निवडणूक आयोगाच्या यादीत नाव असणे हेही नागरिकत्वाचा पुरावा मानला जात नाही. अन्यथा एका राज्यातून ६५ लाख मतदार कमी करण्यात आले नसते. निवडणूक आयोगाने कमी केलेले ६५ लाख मतदार बोगस आहेत हे मान्य केले तर मग लोकसभा निवडणुकीत यातील



अनेकांनी मतदान केले हे मान्य करावे लागेल आणि ही बाब एका राज्यातील आहे. अनेक राज्यांत निवडणूक आयोगाने मतदारयाद्यांची छाननी सुरू केल्यास आणि त्यात लाखो मतदारांचे नाव कमी केल्यास हे सारे अवैध नागरिक आहेत हेही मान्य करावे लागेल. अशा नागरिकांचे भारत सरकार काय करणार?

**एकच कार्ड?** : भारत सरकारने वेगवेगळ्या प्रकारची ओळखपत्रे जारी करण्याऐवजी एकच नागरिकत्व ओळखपत्र जारी करण्याबाबत विचार केला पाहिजे. आणि हे ओळखपत्र जन्माच्या दिवशीच जारी करण्यात आले पाहिजे. अनेक देशांत यासंदर्भात अतिशय कडक प्रक्रिया ठरविण्यात आली आहे. एकदा असे कार्ड तयार झाले की मग तेच नागरिकत्वाचे कार्ड मानले जाईल. काही देशांमध्ये तर जन्मतारखेचे प्रमाणपत्र हेच नागरिकत्वाचे ओळखपत्र मानले जाते. भारतात पूर्वी पुरेशी रुग्णालये नव्हते. मुला-मुलीचा जन्म घरीच होत असे. आता ती स्थिती जवळपास संपलेली आहे. काही अपवाद वगळता बहुतेक जन्म हे रुग्णालयातच होत असतात. त्याच दिवशी त्या मुलाचे-मुलीचे नागरिकत्व कार्ड का तयार केले जाऊ शकत नाही?

**पैसा वाचेल** : आधार, निवडणूक आयोग, आयकर विभाग, रेशन कार्ड असे वेगवेगळे दस्तावेज तयार करण्यासाठी करोडो रुपये खर्च केले जातात आणि यानंतरही बोगस नागरिकत्वाचा मुद्दा आहे तो आहेच. याऐवजी सरकारने एक मास्टर कार्ड तयार करावे, त्यात सारा तपशील देण्यात आल्यास निवडणूक आयोग, आयकर विभाग यांना वेगवेगळे कार्ड तयार करावे लागणार नाहीत. यासाठी वेगळी यंत्रणा उभारावी लागणार नाही, यासाठी करोडो रुपयांची व्यवस्था करावी लागणार नाही.

**सुनावणीचे मुद्दे** : सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात झालेली सुनावणी प्रामुख्याने दोन मुद्द्यांवर झाली. मतदारयादी तयार करण्याचा, या यादीची छाननी करण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार व मतदान करण्याचा सामान्य नागरिकाचा अधिकार. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाचा अधिकार मान्य केला पण, या प्रक्रियेत सामान्य मतदाराचा मतदान करण्याचा अधिकार हिरावून घेता काम नये अशी संतुलित भूमिका न्यायालयाने घेतली आहे. निवडणुकीच्या ऐन तोंडावर आयोगाने मतदारयादी जाहीर केली आणि त्यात एखाद्या पात्र मतदाराचे नाव नसेल तर त्याला आपला मताधिकार वापरण्याची संधी मिळाली पाहिजे. यासाठी निवडणुकीच्या ऐन तोंडावर मतदारयाद्या जाहीर न करता पुरेसा कालावधी असताना त्या घोषित केल्या पाहिजेत जेणेकरून अन्याय झालेल्यांना आयोगाकडे दाद मागता येईल व आपल्या नावाचा समावेश निवडणुकीपूर्वी मतदारयादीत करता येईल अशी सर्वोच्च न्यायालयाची भूमिका दिसून येते, जी योग्य अशीच आहे.

**वादग्रस्त आदेश** : सर्वोच्च न्यायालयाचा एक निर्णय मात्र वादग्रस्त ठरला. बेवारशी श्वानांना पकडून त्यांची रवानगी निवारागृहात करावी असा एक निर्णय न्यायालयाने दिला. याचे तीव्र पडसाद केवळ राजधानीतच नाही तर देशात अन्य ठिकाणी उमटले. देशभरात बेवारशी श्वानांची संख्या वाढत आहे. पण, सरसकट त्यांना पकडून अस्तित्वातच नसलेल्या निवारागृहात पाठविणे हा निर्णय क्रूर होता. बेवारशी श्वानांची नसबंदी करून त्यांची संख्या कमी करणे, त्यांचे लसीकरण करणे या बाबी मनपा-नपा यांनी करावयास हव्या होत्या. त्यांनी त्या केल्या नाहीत. अशा श्वानांची संख्या वाढली. मग, दोन चार घटनांचा दाखला देत सर्वोच्च न्यायालयाने वादग्रस्त निर्णय जारी केला.

**अविभाज्य भाग** : श्वान हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे, त्याला मानवी जीवनापासून वेगळे करून चालणार नाही याची नोंद घेण्यास सर्वोच्च न्यायालय विसरले. नोव्हेंबर महिन्यापासून राजधानीत थंडी सुरू होते. त्यापूर्वीच अनेक ठिकाणी लहान लहान झोपड्यांसारखे निवारे बांधलेले दिसू लागतात. श्वानांचा थंडीपासून बचाव व्हावा म्हणून सामान्य जनतेने हे बांधलेले असतात. त्यात श्वानांना ऊब मिळत राहावी म्हणून पुरेसे गवत ठेवलेले असते. कोणतीही सरकारी संस्था हे करीत नसते. तर सामान्य लोक करीत असतात. सर्वोच्च न्यायालयाने या साऱ्याचा विचार न करता असा एक आदेश पारित केला, ज्याची अंमलबजावणी करणे शक्य नव्हते. दिल्ली सरकारजवळ श्वानांसाठी निवारे नाहीत, ती हाताळण्यासाठी कर्मचारी वर्ग नाही, त्यासाठी पुरेसा पैसा नाही. प्रथम समस्या तयार होऊ द्यायची आणि नंतर खडबडून जागे होत अवास्तव उपाययोजना करावयाची हा आमच्या कार्यप्रणालीचा अविभाज्य भाग झाला आहे. यात सुधारणा केव्हा होणार?

## वेध

**अनिल फेकरीकर**

# गावकऱ्यांनी शोधला अरोलीत गुरू!

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची नियुक्ती करण्याचा अधिकार संबंधित विभागालाच असतो. तोच विभाग पवित्र पोर्टलच्या माध्यमाने शिक्षकांची नेमणूक करीत असतो. पण पवित्र पोर्टलची प्रणाली 'सरकारी काम आणि बारा महिने थांब' यानुसार चालते. अशावेळी मुलांनी त्या काळात करायचे काय? त्यांनी पवित्र पोर्टलसाठी लागणाऱ्या वेळेसाठी आपला अभ्यास बुडवायचा का, हा विचार करून नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यात येणाऱ्या अरोली ग्रामपंचायतच्या सरपंच रोशनी प्रशांत भुरे यांनी पुढाकार घेत आपल्या अधिकारांचा वापर करीत पहिल्यांदा विद्यार्थ्यांसाठी गुरू शोधून दिला. हा प्रयोग संपूर्ण नागपूर जिल्ह्यासाठी आता खऱ्या अर्थाने गौरवपूर्ण ठरला आहे.

आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक नाही अशी ओरड करण्यापेक्षा आपणच मार्ग शोधायला हवा, असा विचार सरपंच रोशनी भुरे यांनी केला. त्यांनी विशेष ग्रामसभा आयोजित केली. या ग्रामसभेत शिक्षक नेमला जावा याकरिता ठराव पारित करण्यात आला. त्यानंतर सरपंचांच्या पुढाकाराने मुलांना गुरू मिळण्याचा मार्ग प्रशस्त झाला. मौदा तालुक्यातील अरोली गाव फार मोठे नाही. मात्र येथील गावकऱ्यांनी दाखविलेला मनाचा मोठेपणा नक्कीच मानावा लागेल. येथील सरपंच रोशनी भुरे यांनी गावातील जिल्हा परिषद शाळेत एका शिक्षकाची कमतरता असल्याचे पाहून आपणच काही तरी करावे म्हणून पुढाकार घेतला. आजच्या तारखेत स्वतःहून चांगल्या कार्यासाठी पुढाकार घेणारे दुर्मिळ झाले आहेत. याच दुर्मिळ लोकांपैकी एक ठरल्या आहेत सरपंच रोशनी भुरे. त्यांनी गावची प्रमुख या नात्याने आपल्या गावातील शाळेत शिकणाऱ्या मुलांची व्यथा समजून घेत होतकरू गुरूचा शोध सुरू केला. याकरिता त्यांनी ग्रामपंचायतीत ठराव पारित



करून सर्व सदस्यांना विश्वासात घेतले. अरोली जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक संदीप दक्ष यांचेही सहकार्य मिळवले. यातूनच नवा प्रयोग उदयास आला. प्रथमतः गावातील प्रत्येकाला याची माहिती व्हावी याकरिता खास दवंडी देण्यात आली. त्यात जी व्यक्ती गावातील मुलांना शिकवायला तयार असेल त्यांनी आपली शैक्षणिक योग्यतेच्या कागदपत्रांसह अर्ज ग्रामपंचायतकडे सादर करावा, असे आवाहन केले. त्या आवाहनाला प्रतिसाद देत ६ इच्छुक उमेदवारांनी पटापट गावाच्या भल्यासाठी अर्ज केले. त्या अर्जांची पडताळणी शाळा समितीने ग्रामपंचायतच्या मदतीने केली. सर्व प्रक्रिया नियमानुसार करून सरपंच रोशनी भुरे, मुख्याध्यापक संदीप दक्ष, ग्रामपंचायत सदस्यांनी मिळून संबंधितांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून उच्चशिक्षित रीता विनोद नान्हे या महिलेची निवड जिल्हा परिषद शाळेसाठी शिक्षिका म्हणून करण्यात आली. आता राहिला प्रश्न पगाराचा तर त्यावरही ग्रामपंचायतने तोडगा काढून मार्ग शोधला. सर्व पगार ग्रामपंचायत देणार असल्याचा ठराव सर्वसंमतीने पारित करण्यात आला. म्हणजेच काय तर समजा गावकऱ्यांनी विचार केला तर राव करणार नाही असे चमत्कारिक कार्य सहजतेने करू शकतात, हे सिद्ध केले. अरोली गावातील जिल्हा परिषद शाळेत १ ते ८ वर्ग आहेत. विशेष म्हणजे पूर्वी या शाळेत मुलांची संख्या केवळ ८० होती. पण आता ती वाढून ११८ झाली आहे. दुसऱ्या गावात विद्यार्थी घटत असताना आपल्या गावात संख्या वाढत असल्याचे पाहून सर्वांनाच सरपंच रोशनी भुरे यांचा निर्णय मनापासून पटला. आता प्रश्न असा पडतो की, इतर गावांतील लोकांनीही आपल्या येथील जिल्हा परिषद शाळा टिकविण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. सरकारी शाळा, सरकारी रुग्णालये, एसटी बस, सरकारी उपक्रम टिकले तरच सामान्य माणूस भविष्यात जगू शकतो. अन्यथा सामान्य माणसाला खाजगीकरणाच्या चक्रव्यूहात जगणे कठीण होईल. मरणाशिवाय त्याच्या समोर गत्यंतर राहणार नाही. हा दूरगामी धोका समजून घेत अरोलीतील गावकऱ्यांनी एकमत दाखविले. तसेच एकमत दाखवीत इतरांनीही राजकारण बाजूला सारीत मुलांसाठी पुढाकार घेतला तर महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेची एकही शाळा बंद पडणार नाही. शेवटी, कल्पकतेला कर्तृत्वाची जोड दिली तरच अद्भुत कार्ये जन्माला येतात. त्याकरिताच सामान्य माणूस जागृत झाला पाहिजे. त्याने राजकारणाचा चष्मा परिधान न करता प्रत्येक प्रश्नाला सोडविण्याकरिता डोळसपणे पाहण्याची गरज आहे. समस्या भलेही गंभीर असेल, पण तोडगा काढणारे सरपंच रोशनी भुरे यांच्यासारखे खंबीर नेतृत्व करणारे असतील तर ते नक्कीच गाव नंबर वन होईल. एकंदरीत पाहता जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी हेही यातून प्रत्ययास आले.

९८८१७१७८५९

## कानोसा


**अमोल पुसदकर**

# गणपती बाप्पाकडून काय शिकावे?

पुराण काळापासून आतापर्यंत गणपती सर्व काळांमध्ये भक्तांची प्रिय देवता आहे. गणेशाला बुद्धीची, ज्ञानाची देवता संबोधले जाते. गणेशाला विघ्नहर्ता सुद्धा म्हटले जाते. कुठल्याही पूजेमध्ये पूजनाचा प्रथम मान भगवान गणेशाला दिला जातो. जनमानसामध्ये भगवान गणेशाची जी प्रतिमा आहे, भक्ती आहे, ती अनन्यसाधारण आहे आणि म्हणूनच आज २०२५ मध्ये सर्व आबालवृद्ध गणेशाच्या स्थापनेपासून तर त्याच्या विसर्जनापर्यंत सर्व गोष्टींमध्ये रममाण झालेले असतात. याच गणेश भक्तीचा उपयोग लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी समाज जागृतीकरिता केला होता. त्यांनी सुरू केलेल्या गणेश उत्सव व शिवजयंती उत्सव या दोन्ही उत्सवांना जनतेमध्ये मोठी मान्यता आहे व आजही ते सुरू आहेत.

गणपतीचे स्वरूप जर आपण आपल्या डोळ्यासमोर आणले तर भगवान गणेशाच्या डोक्यावर मुकुट असतो. मुकुट त्यांच्याच डोक्यावर असतो जे सामर्थ्यवान आहेत, शक्तिमान आहेत. मुकुट हे प्रतिष्ठेचे, वैभवाचे प्रतीकसुद्धा आहे. भगवान गणेशाच्या ललाटावर जे त्रिशूळचे चिन्ह आहे. ते त्रिशूळ म्हणजे सत्त्व, रज आणि तम यांच्यावर असलेले नियंत्रण दर्शविते. बघणाऱ्याला सुद्धा त्याच्यातील सत्त्व, रज आणि तम या गुणांची आठवण होऊ शकते.

गणेशाचे मस्तक हे एखाद्या बालकाचे नसून हत्तीचे आहे. त्यामागची कथा सर्वांना माहीत आहेच. एखाद्या अपघातात जर एखाद्याचा एखादा अवयव निकामी झाला, त्याला बदलावे लागले किंवा कापून वेगळे करावे लागले तर त्या व्यक्तीच्या मनात नेहमी त्याच्याजवळ ती गोष्ट नाही याचे किंवा माझ्या शरीराचा हा अवयव चांगला दिसत नाही याचे दुःख असते. तो माणूस नेहमी त्याच दुःखामध्ये असतो. परंतु भगवान गणेशांनी आपल्याला हे दाखवून दिलेले आहे की तुम्ही जर विद्वान व सामर्थ्यवान असाल, चांगले काम करणारे असाल तर लोक तुम्हाला तुमच्या आहे त्या स्वरूपात सुद्धा स्वीकारू शकतात. त्यामुळे जे नाही त्याच्याबद्दल शोक करीत बसण्यापेक्षा जे आहे त्याचा सर्वोच्च वापर कसा करता येईल याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. भगवान गणेशाचे मस्तक मोठे असले तरी ते विश्वातील सर्व विचार सामावून घेण्यासाठी मोठे आहे. बरेचदा अनेक लोक एकांगी विचारसरणीचे असतात. त्यांच्या डोक्यामध्ये इतरांचा पण काही दृष्टिकोन असू शकतो याचा त्यांना मागमूसही नसतो. गणेशाचे मोठे मस्तक पाहून आपल्याला व्यापक विचार, इतरांचा विचार व विविध विचार समजून घेण्याची पात्रता अंगी आली पाहिजे याची आठवण होणे आवश्यक आहे.



गणपतीचे डोळे बारीक आहेत, लहान आहेत. बारीक म्हणजे बारकाईने प्रत्येक गोष्ट बघणारे आहेत. डोळे तर सगळ्यांनाच असतात, तरीपण चालता चालता एखाद्या गोष्टीला धडक देणाऱ्याला आपण म्हणतो की डोळे नाहीत का? पण डोळे नसेल तर तो चालेल कसा? याचा अर्थ असा की डोळे असूनही अनेकांचे जिथे पाहिजे तिथे लक्ष नसते. विद्यार्थ्यांचे अभ्यासात लक्ष नसते, कर्मचाऱ्यांचे कामात लक्ष नसते, शिक्षकांचे शिकवण्यात लक्ष नसते, कामगारांचे श्रमात लक्ष नसते, राजकीय नेत्यांचे लोकसेवेकडे लक्ष नसते. गणपतीचे बारीक डोळे आपल्याला सांगतात की प्रत्येक गोष्टीचा बारकाईने विचार करा. एखादा माणूस एखाद्या कागदपत्रावर सही करतो नंतर जेव्हा तो त्याच्यामध्ये अडकतो त्यावेळेला त्याला कोणीतरी विचारते की, तुम्ही सही केलेली आहे तेव्हा वाचले नव्हते का? तर तो म्हणतो की वाचले होते पण बारकाईने वाचले नव्हते. त्यामुळे भगवान गणेशाचे डोळे आपल्याला बारकाईने काळजीपूर्वक सर्व गोष्टी बघण्याची आणि मग खात्री करण्याची शिकवण देतात.

भगवान गणेशाचे कान मोठे आहेत. मोठे कान आपल्याला सांगतात की भरपूर ऐका. जर तुम्ही समोरच्याचे ऐकत राहिला तर हळूहळू त्याच्या जवळचे बोलण्यासारखे जे आहे ते सगळं संपून जाईल व त्यानंतर त्याचे सगळे मुद्दे तुम्ही ऐकलेले असल्यामुळे त्याला कशा पद्धतीने उत्तर द्यायचे हे तुमच्या लक्षात येईल. मोठ्या कानांमुळे तुम्हाला तुमची प्रशंसाही ऐकू येईल आणि तुमच्यावरची टीकाही ऐकू येईल. प्रशंसेमुळे तुम्ही प्रोत्साहित व्हाल आणि टीकेमुळे स्वतःमध्ये सुधारणा करण्यासाठी वाव मिळेल. गणेशाचे मोठे कान हा संदेश आपल्याला देत आहेत.

कान मोठे आहेत परंतु गणेशाचे तोंड लहान आहे. म्हणजे भरपूर ऐका, विचार करा आणि कमी शब्दात त्याचे उत्तर द्या. जितके तुम्ही अधिक बोलाल तेवढे तुम्ही एखाद्या गोष्टीमध्ये फसण्याची शक्यता अधिक असते. अनावश्यक बोलू नका हा संदेश भगवान गणेश आपल्याला देत आहेत.

गणेशाची सोंड लांब आहे. जे पाहिजे ते घेण्यासाठी पण सोंडेचा वापर आहे, जे नको ते दूर फेकण्यासाठी पण सोंडेचा वापर आहे. श्वास घेणे, पाणी पिणे, खाणे, शत्रूला सोंडेने धरून दूर फेकून देणे ही सगळीच कामे सोंड करते. सोंड आपल्याला सांगते की तुमच्या विरोधातील संकटांचा तुम्हाला दुरूनच वास आला पाहिजे. सोंड आपल्याला सांगते जो तुमच्या हिताचा आहे त्याला जवळ घ्या, जो अहित करणारा आहे त्याला उचलून दूर फेकून द्या.

भगवान गणेशाचे पोट मोठे आहे. मोठे पोट म्हणजे सर्व चांगल्या-वाईट गोष्टी साठवण्याची आणि पचवून टाकण्याची क्षमता या पोटामध्ये आहे. भगवान गणेश आपल्याला सांगतात की तुमचेही पोट मोठे असू द्या. म्हणजे शारीरिक अर्थाने नाही तर आई जशी आपल्या लेकरांचे अपराध पोटात घेते तसे काही लोकांचे अपराध तुम्हालाही पोटात घेता आले पाहिजेत. समाजामध्ये काम करताना अनेक प्रसंगी मान-अपमान होत असतात. ते पण तुम्हाला पचविता आले पाहिजेत.

तुटलेला सुळा भगवान गणेशाचा आपल्याला हे सांगतो की, कुठल्याही कारणाने का होईना तुमच्या शरीराला अपूर्णता मिळाली असेल तरी खचून जाऊ नका, शरीर सर्व काही नाही. मन, बुद्धी, वागणूक याही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मनुष्याची ओळख त्याच्यावरून सुद्धा होते. भगवान गणेशाला चार हात दाखविलेले आहे. त्यापैकी एका हातामध्ये अंकुश आहे. अंकुश आपल्याला सांगतो की तुम्ही तुमच्या इच्छा, आकांक्षा, वासना यावर अंकुश ठेवा. भगवंताच्या एका हातामध्ये पाश आहे. भगवान आपल्याला म्हणतात जो तुमच्या संपर्कात येईल त्याला तुम्ही आपल्या प्रेमपाशाने बांधा. भगवंताच्या एका हातामध्ये मोदक आहे. ते भक्ती, ज्ञान आणि कर्म यांचे फळ आहे. या जर गोष्टी तुमच्या चांगल्या असेल तर तुम्हाला मोदकासारखं गोड फळ मिळेल. भगवंताच्या एका हाताची आशीर्वादाची मुद्रा आहे. जो गणेशाचे स्तवन करेल, त्याची भक्ती करेल त्याला भगवंताचा नेहमीच आशीर्वाद राहील. भगवान गणेशाच्या दर्शनाने आपल्याला आता एक नवीन संदेश प्राप्त होऊ शकणार आहे. तो आपल्याला हितकारक असा आहे. भगवान गणेश आपल्या मार्गातील विघ्न दूर करो आणि आपल्याला आपल्या कर्तव्य मार्गावर चालत प्रगतीकडे जाण्यासाठी बुद्धी, ज्ञान, शक्ती प्रदान करो हीच गणरायाच्या चरणी प्रार्थना आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### डीजे, लेझर बीममुक्त उत्सव साजरे करूया

भारतीय समाजात सण, उत्सव, विवाह समारंभ व सर्वच सार्वजनिक कार्यक्रम मोठ्या धूमधडाक्यात व आनंदाने साजरे करण्याची परंपरा फार मोठी आहे. तथापि या चांगल्या परंपरेला सुद्धा आधुनिक तंत्रज्ञानाचा ब्रह्मराक्षस एका वेगळ्या वळणावर नेऊन अनिष्ट व घातक परिणाम घडवून आणतो आहे, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सण, उत्सव व सर्वच सामाजिक कार्यक्रम साजरे झालेच पाहिजेत. आपली संस्कृती विविधतेने नटलेली असल्यामुळे सर्वच ठिकाणी काही ना काही हे उत्सव साजरे होतच असतात. तेव्हा त्याला आक्षेप घेण्याचे काही कारण नाही. पण ते साजरे करताना मानवी जीवितास घातक होत चाललेल्या डीजे वाद्याच्या घातक प्रथेला मात्र आता गांभीर्याने घेतले पाहिजे. कारण या डीजेमुळे ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, लहान मुले, गर्भवती स्त्रिया, इतकेच काय पण पशुपक्षी इत्यादी सर्वच जीवसृष्टीला त्रास होत आहे.

डीजेच्या कर्कश ध्वनीमुळे, हृदयाच्या ठोक्यावर, हृदयाच्या गतीवर, अनिष्ट परिणाम होऊन दरवर्षीच मिरवणुकीमध्ये अनेक तरुणांना हार्ट अटॅक येऊन आपला जीव गमवावा लागतो. तरीही आपण अजून सुधरत नाही. आणि त्यात जबाबदार शासकीय यंत्रणा व इतरही व्यवस्था जर मूग गिळून बसल्या तर मनुष्यमात्र किंवा अखिल जीवसृष्टी बरोबरच पर्यावरणाची सुद्धा मोठी हानी होणार हे निश्चित. यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने ध्वनी प्रदूषणाबाबत काही निकष तयार केले आहेत. त्यानुसार रहिवासी विभागात दिवसा ५५ डेसिबलपर्यंत व रात्री ४५ डेसिबलपर्यंत ध्वनीची मर्यादा आहे. हीच मर्यादा औद्योगिक क्षेत्रासाठी ७५/७० डिसेबलपर्यंत आहे. तथापि जेथे केवळ एकच डीजे वाजवला जातो तेथे ही मर्यादा किमान १०० डेसिबलच्या वर १३० डेसिबलपर्यंत नेहमी आढळून येते. हे ध्वनी मर्यादेचे मोठे उल्लंघन आहे. यामुळे बहिरेपणा सोबतच स्वभावातील चिडचिडेपणा, उच्च रक्तदाब, मानसिक तणाव निर्माण होणे, स्मृतिभ्रंश होणे, निद्रानाश, नैराश्य येणे, कानातील नसा मोठ्या प्रमाणावर कमकुवत होणे, मोठ्या आवाजामुळे हृदयाच्या धमन्या आकुंचन पावणे व त्यामुळे हृदयविकार जडणे, इत्यादी सारखे आजार उत्पन्न होण्याचे प्रमाण वाढले आहे. तेव्हा याच्यावर नियंत्रण आणणे किंवा यावर बंदी घालणे ही आता काळाची गरज झाली आहे. तेव्हा आगामी गणेशोत्सव, नवरात्री उत्सव आणि त्यानंतरच्या सुरू होणाऱ्या लग्नसराईत सुद्धा आपण सर्व जण मिळून डीजेमुक्त तसेच लेझर लाईटमुक्त उत्सव सण साजरे करूया.

**मोहनशास्त्री जलतारे**/९८२२७११७३३

●● ●●

### हुडकेश्वर रस्ता दुरुस्त करा हो!

नागपुरातील म्हाळगीनगर चौक ते पिपळा फाटापर्यंतचा सर्वांत जास्त रहदारी असलेला हुडकेश्वर मार्ग अवघ्या तीन वर्षांत जागोजागी उखडला आहे. म्हाळगीनगर चौकापासून पिपळाकडे जाताना चौकापासून शंभर मीटर अंतरापर्यंत मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. तसेच शाहू पेट्रोल पंपजवळील पुलाच्या दोन्ही बाजूने सुमारे शंभर मीटरपर्यंत इतके मोठमोठे खड्डे आहेत की कोणतेही वाहन चालविणे कठीण झाले आहे. दुचाकीस्वार या खड्ड्यातून वाहन चालवताना वाहनासह खाली पडतात आणि जखमी होतात. रस्ता इतका खराब झालेला आहे की वाहने तर सोडाच पायी चालणे सुद्धा कठीण झाले आहे. बऱ्याच ठिकाणी तब्बल अर्ध्या अर्ध्या फुटाचे खड्डे पडलेले आहेत. आता पावसाळ्याचे दिवस असताना या खड्ड्यांत पावसाचे पाणी साचून खड्डे नेमके कुठे आहेत हेच दिसत नाहीत. त्यामुळे वाहन चालवताना या खड्ड्यांत वाहने वेगाने आदळतात आणि अपघात होतात. भरीस भर शाहू पेट्रोल पंपजवळील पुलाच्या दोन्ही बाजूचे पथदिवे बंद आहेत. त्यामुळे पुलावर आणि पुलाच्या दोन्ही बाजूंनी जे खड्डे आहेत त्याठिकाणी रात्रीच्या वेळी दाट अंधार असतो. पण स्थानिक प्रशासनाचे याकडे अजिबात लक्ष नाही. कदाचित एखाद दुसऱ्याचा जीव गेल्यावरच प्रशासनाला जाग येईल.

सदर रस्त्यांचा दर्जा इतका सुमार आहे की पूर्वीचे डांबरी रस्ते परवडले पण हे सिमेंटचे रस्ते नकोत अशी नागरिकांची भावना झालेली आहे. डांबरी रस्ते लवकर खराब होतात म्हणून सिमेंटचे मजबूत रस्ते बांधण्यात आले होते. पण झाले नेमके उलटे. पूर्वीचे डांबरी रस्ते आताच्या सिमेंट रस्त्यांपेक्षा अधिक चांगले होते असे म्हणायची वेळ आलेली आहे. सिमेंटचे रस्ते डांबरी रस्त्यांसारखे एखाद दुसऱ्या ठिकाणी उखडून खड्डे पडत नाहीत. सिमेंट रस्त्यांचा वरचा सिमेंटचा थर सलगपणे दूरपर्यंत उखडत जातो आणि खालची टोकदार गिट्टी वर येऊन रस्त्यांची दुर्दशा होते. रस्ते बांधकामात प्रमाणशीर सिमेंट न वापरल्याने किंवा सिमेंट कमी आणि ऊर्जा प्रकल्पांमधून निघणारी राख जास्त प्रमाणात वापरल्याने रस्त्यांची मजबुती टिकत नाही. रस्त्यांवरील टोकदार गिट्टी वर आल्याने वाहनांचे टायर लवकर खराब होत आहेत. जनतेच्या रोषाला बळी पडण्याआधीच हुडकेश्वर रस्ता ताबडतोब दुरुस्त करण्यात यावा ही अपेक्षा.

**अतुल सोमेश्वर कावळे**/९७३०५३५१९६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com




बीड जिल्हा आरसीसी बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने कामगारांच्या न्याय व हक्कासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य विराट मोर्चा काढण्यात आला. वाळू चालु झालीच पाहिजे, वाळूचे टेंडर काढून वाळू खुली करण्यात यावी, कामगारांना ९० दिवसाचे प्रमाणपत्र ग्रामसेवकांकडून देण्यास नकार दिला जात असून ते तात्काळ देण्यात यावे, नोंदणी व नुतनीकरणासाठी संबंधित प्रलंबित कामे निकाली काढण्यात यावीत, दुरूस्ती प्रक्रिया लवकर पुर्ण करण्यात यावी आदि मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाला देण्यात आले. यावेळी शेख मुख्तार सत्तार, अलिम पटेली, सय्यद नजीर, मोइनोद्दीन फारूख यांच्यासह बीड जिल्हा आरसीसी बांधकाम कामगार संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(छाया-कृष्णा शिंदे)**

# अंबाजोगाईत किरकोळ वादातून हाणामारी; परस्परविरोधी गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ ऑगस्ट**

अंबाजोगाई शहरातील गुरुवारपेठेत दोन दिवसांपूर्वी झालेल्या किरकोळ कारणावरून पेटलेल्या वादाचे पर्यवसान मोठ्या भांडणात होऊन हाणामारी झाली. त्यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुद्ध मारहाण व जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या तक्रारी दाखल केल्या. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हे नोंदवले आहेत.

शिवसंदेश जनार्धन राऊत यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २४ ऑगस्ट रोजी रात्री १०.३० वाजता सौरभ सुरवसे, संस्कार सुरवसे, दिनेश सुरवसे व सागर सुरवसे हे चौघेजण त्यांच्या घरी आले. वादाच्या कारणावरून त्यांनी शिवानंद वाघाळकर याला विट मारली तसेच फिर्यादी राऊत, त्यांचे भाऊजी संजय शिंदे व रोहित शिंदे यांना काठीने मारहाण केली. यावेळी शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यावरून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.दरम्यान, याच घटनेत दुसऱ्या बाजूने सौरभ सुरवसे याने पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार, ते आपल्या आईवडील व नातेवाईकांसह रोहित शिंदे यांच्या घरी गेले असता बोलाबोली व शिवीगाळ झाली. यावेळी बबलु राऊत याने सौरभ याच्या डोक्यात कोयत्याने वार केला, रोहित शिंदे याने बॅटने मारहाण केली, तर शिवानंद वाघाळकर याने सागर सुरवसे याला दगड मारला. तसेच तारामती सुरवसे यांनाही मारहाण झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. या आधारावर रोहित शिंदे, बबलु राऊत व शिवानंद वाघाळकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या परस्परविरोधी फिर्यादीवरून गुन्हे नोंदवून तपास सुरू केला आहे.

# बीड जिल्ह्याची बदनामी करणाऱ्यांना पत्रकार व संपादकांनी चाप लावावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**



सर्वोत्तम गावरस्कर यांनी कुठलाही आधार नसतांना स्वतःचे साप्ताहिक सुरू केले. आणि त्यानंतर दैनिक करून दोन जिल्ह्यात चालवले ही गोष्ट सोपी नव्हती. मात्र हिमतीने हे दैनिक पुढं चालले. बीडची पत्रकारिता सकारात्मक झाली पाहिजे आणि बीडचे जे नाव खराब झाले आहे ते पुन्हा पूर्ववत होण्यासाठी सर्वांनी सकारात्मक गोष्टी पुढे आणल्या पाहिजेत असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांनी दैनिक सुराज्यचे संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांच्या नागरी सत्कार प्रसंगी बोलताना केले. यावेळी त्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनाचे अनेक किस्से सांगून श्रोत्यांना खळखळून हसवले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रदीप दुबे तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख ,ज्येष्ठ पत्रकार अशोकराव देशमुख उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने म्हणाले की बीडच्या सर्व पत्रकारांनी मिळून बीडची रेल्वे आणण्यासाठी प्रयत्न केले होते. रेल्वे लवकरात लवकर यावी अशी सदिच्छा आहे.

# महिला स्वच्छतागृहांचा प्रश्न मार्गी : शेख सालेहा जिलानी

## परळी शहरात शौचालयाची बांधकामे प्रगतीपथावर

## शौचालयाची स्वच्छता राखण्याचे नागरिकांना आवाहन : मुख्याधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ ऑगस्ट**

महिलांसाठी स्वच्छतागृह असावेत या मागणीला घेऊन जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी दिलेल्या आदेशानुसार जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यात सद्या शहारत महिला स्वच्छतागराची कामे प्रगतीपथावर असल्या ची माहिती समाजवादी पार्टी महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्षा सालेहा जीलानी शेख यांनी दिली. सालेहा जिलानी शेख यांनी आज परळी न.प. मध्ये येऊन जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार महिलांसाठी विशेष स्वच्छतागृह चे काम पाहून समाधान व्यक्त केले.

बुधवारी (दि.२०) न.प. मध्ये मा.मुख्याधिकारी त्रिंबकजी कांबळे यांची भेट घेऊन नंतर नगररचना विभागातील ज्ञानेश्वर ढवळे यांच्याकडून शहरात होत असणाऱ्या एकूण शौचालयाची माहिती घेतली.

परळी शहरांमध्ये दोन योजना मधून ९ स्वच्छतागृह (शौचालय) उभारणीस मंजुरी मिळालेली आहे यातील बहुतेक स्वच्छतागृहाची कामे येत्या महिन्याभरात पूर्ण होतील

योजना अ) स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत
१) सरकारी दवाखाना जवळ शौचालय,
२) मोंढा, मार्केट कमिटी जवळ
३) वैद्यनाथ मंदिर परिसर

योजना ब) तीर्थक्षेत्र विकास योजना श्री क्षेत्र वैद्यनाथ ज्योतिर्लिंग (स्वच्छता गृह)
१) बस स्थानक परिसर,
२) रेल्वे स्टेशन परिसर,
३) जिजामाता उद्यान जवळ,
४) मार्केट कमिती चरिसर,
५) डा. घुगे दवाखान्या जवळ,
६) वडार कॉलनी जवळ,

असे एकूण ९ स्वच्छता ग्रह शौचालय तयार होत आहेत.

या वेळी बोलतांना शेख सालेहा जीलानी म्हणाल्या प्रथम जिल्ह्यातील महिलांच्या सुलभ शौचालयाच्या प्रश्नाची मा.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन सर यांनी दखल घेतली आणि संबंधित विभागांना तसे आदेश देऊन सूचित केले याबद्दल समस्त जिल्ह्यातील महिलांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार मानते.

जिल्ह्यातील जुनी आणि नवीन सर्व शौचालय, स्वच्छतागृहे लवकरच सुरू होतील. कामानिमित्त घरा बाहेर पडणाऱ्या महिलांना व जिल्ह्यात अनेक महत्त्वपूर्ण धार्मिक स्थळे ,पर्यटन स्थळे आहेत तेव्हा जिल्हा बाहेरून येणाऱ्या महिलांची खूप मोठी संख्या आहे. जिल्ह्यात बाहेरून येणाऱ्या सर्व मैत्रिणी, भगिनी, यांना मोठा दिलासा मिळेल अस मला वाटतं.

जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ आदेश काढले नाहीत तर सुलभ शौचालयाच्या संदर्भात केलेल्या कामाचा अहवाल सुध्दा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावा असेही आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे एकूणच बीड जिल्ह्यातील महिलांना भेडसावणरा हा प्रश्न मार्गी लागल्याने आम्ही जिल्ह्यातील महिला समाधानी आहोत असेही त्या म्हणाल्या.

शहरात सद्यस्थितीत वापरात असलेली आणि नवीन सुरू होणारी शौचालय लवकरात सुरू होतील या साठी आम्ही प्रयत्नशील आहोत. ही शौचालय वापरताना ती स्वच्छ राहतील याची काळजी नागरिकांनी घ्यायला हवी.

त्रिंबक कांबळे
मुख्याधिकारी न.प. परळी वैजनाथ

# २९ ऑगस्ट चलो मुंबई मराठा आरक्षणाची आरपारची लढाई

## मराठा बांधवांनी लाखोच्या संख्येने सहभागी व्हावे-राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**



गेली ४० वर्षापासून मराठा आरक्षणाचा लढा चालू आहे.राजकीय हेतूने प्रेरित होऊन शासनकर्ते मराठा आरक्षणाकडे दुर्लक्ष करत आले आहेत. ओबीसी मधून मराठा बांधवांना आरक्षण मिळाले पाहिजे, यासाठी मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील दोन वर्षापासून सातत्याने संघर्ष करत आहेत.राज्यात बहुसंख्येने असणारा मराठा समाजाचा विकास खुंटला असून समाजातील तरुणांचे भवितव्य अधांतरी लटकले आहे. दारिद्र्य व आर्थिक संकटात अडकलेल्या मराठा समाजाला उन्नतीच्या मार्गावर जाण्यासाठी आरक्षणाची गरज आहे. प्रगतीच्या मुख्य प्रवाहात मराठा समाजाला स्थान मिळाले पाहिजे.

न्याय मागणीसाठी दिनांक २९ऑगस्ट २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई येथे मनोज दादा जरांगे पाटील उपस्थितीत आंदोलन होणार आहे. भावी पिढीच्या भवितव्या साठी मराठा बांधवांनी लाखोच्या संख्येने या लढ्यात सहभागी व्हावे. असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी डोंगर पाटोदा ता. बीड येथील अखंड हरिनाम सप्ताह सांगता प्रसंगी उपस्थित भाविक भक्तांसी संवाद साधताना केले आहे.बीड तालुक्यातील पाटोदा (बे) येथे श्रीक्षेत्र नारायण गडांचे महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शना खाली चौदाव्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता नारायण गडाचे नूतन उत्तराधिकारी हभप संभाजी महाराज यांच्या कीर्तनाने झाली. पंडित तुपे व त्यांचे सहकारी अमोल माने,अविनाश बडगे, बाबू माने, चंद्रसेन माने, भरत माने, दादा गोंदवले, गोविंदा गोंदवले, अशोक तुपे, यांच्यासह समस्त गावकरी मंडळींनी खंड हरिनाम सप्ताहाचे यशस्वी नियोजन केले. सांगता समारोप प्रसंगी परिसरातील भावी फक्त बहुसंख्येने सहभागी झाले होते.

## आपण स्वतः मागे राहुन कार्यकर्त्यांना पुढे करणारा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख



बीडमध्ये आ.संजय केनेकर एका कार्यक्रमाला आले असता कार्यकर्त्यांनी फोटो काढले त्यावेळी स्वतः मागे राहुन कार्यकर्त्यांना फोटोची संधी दिली काही लोक कार्यकर्त्यांना मागे करुन स्वतःचे फोटो काढताना आज पर्यंत पाहीले आहे. परतु बीड जिल्हा भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी मागे राहून कार्यकर्त्यांना फोटोची संधी दिली.

# नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे एक दिवसीय गणपती कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**



दीनदयाल शोध संस्था संचलित नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे पर्यावरण पूरक मातीचे गणपती बनवण्याची कार्यशाळा रोटरी क्लब ऑफ बीड आणि दैनिक दिव्य मराठी च्या वतीने आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा २३ ऑगस्ट रोजी घेण्यात आली. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांना शाडूच्या मातीपासून गणपती तयार करण्याचे शिकवले. यावेळी प्रशिक्षक कृष्णा शेवंत कर सर आणि ऋतिक बोरा सर हे होते. त्यांनी मुलांना प्रत्यक्षरीत्या समोर गणपतीची मूर्ती तयार करून दाखवली आणि विद्यार्थ्यांना करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यात भर पडली आणि विद्यार्थ्यांनी एकाग्र चित्ताने गणपतीची मूर्ती बनवली.

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ बीड मिड टाउन चे अध्यक्ष राहुलजी बोरा सर, अनुराग जैन सर, नितीन गोपन सर, प्रेमराज मुंजे सर, अमोल तळेकर सर, डॉ. स्वप्निल उन्हाळे सर, डॉक्टर प्रकाश कोक्टा सर, मा. गंगाधरजी देशमुख सर, मा .सुनंदाताई कुलकर्णी, मा.अर्चनाताई तुंगार, मा.गोरक्षनाथ आबुज सर, अर्चनाताई मोराळे हे सर्वजण उपस्थित होते.कार्यशाळा संपल्यानंतर रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्यावतीने विद्यार्थ्यांना प्रतिनिधी स्वरूपात प्रमाणपत्र देण्यात आले. ही कार्यशाळा पार पाडण्यासाठी सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ .शितलताई कुलकर्णी आणि आभार सोनसाळे ताई यांनी मानले.



# गणेशोत्सव : परंपरा, एकात्मता आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख

महाराष्ट्र सरकारने नुकताच एक ऐतिहासिक निर्णय घेत सार्वजनिक गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा दिला आहे . सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी विधानसभेत ही घोषणा करताना गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या आत्म्याचा उत्सव आहे असे प्रतिपादन केले . हा शासन निर्णय केवळ औपचारिकता नाही , तर लोकमान्य टिळकांच्या सामाजिक दृष्टीकोनाला सलाम करणारा , परंपरेला मान्यता देणारा आणि भविष्यातील पिढ्यांना दिशा दाखवणारा आहे.

इतिहासाच्या पाऊलखुणा : गणपती ही बुद्धी , विद्या , समृद्धीची देवता . वैदिक काळापासून गणेशोपासना अस्तित्वात आहे . परंतु १८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले आणि ब्रिटिशांच्या विरोधात समाज एकत्र येण्याचे माध्यम निर्माण केले . गल्ल्या , वाडे , मोहल्ले एकत्र आले आणि गणपती बाप्पा मोरयाच्या घोषणांनी इंग्रजांविरुद्ध लढ्याला जनाधार दिला .

महाराष्ट्रातील परंपरा : महाराष्ट्रात गणेशोत्सव म्हणजे भक्ती , संस्कृती , समाजसेवा आणि लोकसहभाग यांचा संगम . पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपतीपासून मुंबईतील लालबागचा राजापर्यंत असंख्य मंडळे आपल्या कलात्मक मांडणी , सामाजिक उपक्रम आणि धार्मिक वातावरणासाठी प्रसिद्ध आहेत . लोकमान्य टिळकांनी घडवलेला हा उत्सव आज गल्लोगल्लीतील बाप्पा म्हणून महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यात पोचला आहे .

महाराष्ट्रातील गणेश उपासनेत अष्टविनायक यात्रा विशेष मानली जाते . पुणे जिल्ह्यातील आठ प्राचीन गणेश मंदिरे – मुरुडचे मोरेश्वर , सिद्धटेकचे सिद्धिविनायक , ओझरचा विघ्नहर , लेण्याद्रीचा गिरिजात्मक , रांजणगावचा महागणपती , थेऊरचा चिंतामणी , पालीचा बल्लाळेश्वर आणि महडचा वरदविनायक – या सर्वांना एकत्र भेट देणे ही यात्रा पूर्ण मानली जाते . भक्त आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आणि गणरायाच्या कृपेचा लाभ घेण्यासाठी ही यात्रा करतात . त्यामुळे अष्टविनायक ही गणेशभक्तीची अनोखी परंपरा आहे . ओव्या अजूनही आपल्याला भूतकाळाशी जोडतात –

गणराया गणपती देवा
तुझ्या चरणी माथा ठेवा
मंगलमुर्ती मोरया रे
दूर करो संकट सारे .

भारत आणि जगातील गणेशोत्सव : आज गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही . गोवा , कर्नाटक , आंध्र प्रदेश , तेलंगणा इथून तो दक्षिण भारतात विस्तारला . उत्तर भारतात दिल्ली , मध्य प्रदेशात जबलपूर आणि इंदूर येथे मोठ्या उत्साहाने गणेशोत्सव होतो . परदेशातही भारतीय समाजाने हा उत्सव रूजवला आहे . लंडन , दुबई , सिंगापूर , अमेरिकेतील न्यू जर्सी व कॅलिफोर्निया , ऑस्ट्रेलिया , कॅनडा येथे दरवर्षी गणेशोत्सव साजरा केला जातो . परदेशातील गणेशोत्सव परदेशात राहणाऱ्या भारतीयांसाठी एक ओळखीचे घर बनतो .

गणेशोत्सव आणि समाजसेवा : गणेशोत्सव केवळ धार्मिक विधी नाही , तर विधायक कामांचे व्यासपीठ आहे . अनेक मंडळे रक्तदान शिबिरे , आरोग्य शिबिरे , वृक्षारोपण , शैक्षणिक मदत , आपत्तीतील मदतकार्य अशी उपक्रम राबवतात . गणेशोत्सव हा लोकांना फक्त साजरा नाही , तर समाजासाठी काही देणगी दे हे स्मरण करून देतो .

गणेशोत्सव आणि एकात्मता : गणेशोत्सव हिंदू-मुस्लीम एकतेचा सेतू ठरला आहे . इतिहासात अनेक मंडळांच्या मिरवणुकांमध्ये सर्व धर्मीय सहभागी झाले . डोलताशे , लेझीम , भजन-कीर्तन , नृत्य , कलाविष्कार – सर्वांनी मिळून गणपतीला लोकोत्सव बनवले . तो फक्त धार्मिक नव्हे तर सामाजिक-सांस्कृतिक संगम आहे .

संगीत, गाणी आणि बाप्पा : गणेशावर आधारित असंख्य ओव्या , अभंग , गवळणी लोकजीवनात लोकप्रिय आहेत . आधुनिक काळातही बप्पावर आधारित हिंदी चित्रपट गाणी लोकप्रिय झाली – सदैव सदा गणेश गणेश, गणपती बाप्पा मोरया (अग्निपथ चित्रपट ), देवा श्री गणेशा ( अग्निपथ ), गणेश आया है ( भूतनाथ रिटर्न्स ) यासारखी गाणी आजही मिरवणुकीत दुमदुमतात . लोककला , शास्त्रीय संगीत , आणि आधुनिक बॉलिवूड – सर्वांनी मिळून बाप्पाची भक्ती अधिक रंगतदार केली आहे .

शासन निर्णयाचे महत्त्व : या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने सार्वजनिक गणेशोत्सवाला राज्य उत्सव घोषित करणे ही केवळ परंपरेला मान्यता नव्हे तर सांस्कृतिक अस्मितेची जपणूक आहे . यामुळे मंडळांना शासकीय सुविधा मिळतील , उत्सवाची मुळे अधिक घट्ट होतील आणि जागतिक पातळीवर महाराष्ट्राची ओळख ठळक होईल .

बाप्पा हे महाराष्ट्राचे स्पंदन : गणेशोत्सव आपल्याला शिकवतो – भक्ती ही एकत्र आणणारी आहे , कला ही संस्कृतीला समृद्ध करणारी आहे आणि समाजकार्य हे खरी पूजा आहे . गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या जीवनातला श्वास आहे .

जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शनमात्रे मनकामना पूर्ती

गणेशोत्सव हा केवळ राज्य उत्सव नाही तर तो महाराष्ट्राच्या मनाचा उत्सव आहे , आणि आता शासनाने त्याला दिलेला मान म्हणजे परंपरेच्या मूळांना अधिक बळ देणे होय.

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सदाभाऊ खोत यांचे वक्तव्य गोरक्षकांना प्रचंड वेदना देणारे- सोनी

## राज्यात गोवंश हत्या कायदा आणखी कडक करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ ऑगस्ट**
भारतीय जनता पक्षाचे विधान परिषद सदस्य सदाभाऊ खोत यांनी शेतकऱ्यांना भाकड जनावरे सांभाळणे कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे. त्यातच गोरक्षक हे गोभक्षक झाले आहेत असे वक्तव्य केले. सदरील वक्तव्य हे गोरक्षकांसह हिंदू समाजाला प्रचंड वेदना देणारे असून गोवंश कायदा आणखी कडक करावा अशी मागणी प्रकाशंचद सोनी यांच्यासह गोरक्षकांनी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मागील आठवड्यात भाजपचे विधान परिषद सदस्य सदाभाऊ खोत यांनी गोवंश हत्या बंदी कायदा नव्हे हा गोपालक कायदा बनला आहे. आज शेतकऱ्यांसमोर भाकड गाई व जनावरे यांचे काय करायचे असा प्रश्न पडला असून अशी जनावरे बाहेर विकायला गेल्यास रस्त्यावर गोरक्षक गाड्या अडवित आहेत. खंडणी बहाद्दर बनून खंडणी गोळा करीत आहेत. त्याचा फटका गाववाड्यातील शेतकऱ्यांना बसत आहे. गोररक्षकांच्या गोरख धंद्यामुळे पूर्ण शेतकरी संकटात सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्याला पर्यायी लढा द्यावा लागेल असे वक्तव्य केले.

या वक्तव्यावर हिंगोलीतील गोरक्षक समिती तसेच हिंदू समाजाच्यावतीने तीव्र नाराजी व्यक्त करीत जिल्हाधिकारी यांचेमार्फत केंद्र व राज्य शासनाला निवेदन सादर केले आहे. निवेदनात भारत तसेच महाराष्ट्र हा देश संतांची भूमी आहे. येथे हिंसेला स्थान नाही. कोणत्याही धर्मात हिंसा मान्य नाही. परंतु सदाभाऊ खोत यांनी यांनी केलेले वक्तव्य गोरक्षक, समस्त हिंदू समाज व गोमातेच्या संरक्षाच्या चळवळीमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक घटकाला वेदना देणारे आहे. केंद्र व राज्य सरकारने गोवंश हत्या बंदी कायदा लागू केलेला आहे. हा कायदा आणखी कडक करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर प्रकाशचंद सोनी, शिवप्रसाद वाबळे, किरण इंगोले, कैलास घोंगडे, एकनाथ श्रीरामे, भीमराव रावजी, मोहन चव्हाण, राजु देशमुख, बन्सी चव्हाण, माऊली कुन्हे, जगन्नाथ घुगे, बद्रीनारायण सारडा, रायाजी इंगोले, एस आर वाबळे, दत्तराव गाडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोलीत सीएनजी पंप चालकाची मनमानी, तासन्तास वाहने रांगेत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ ऑगस्ट**
शहरातील एकमेव सीएनजी पंपावर वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पंप चालकाच्या मनमानी कारभारामुळे सीएनजी भरण्यासाठी वाहनधारकांना तासन्तास रांगेत थांबावे लागत असून, या प्रकारामुळे वाहनचालकांचा संताप वाढला आहे.

हिंगोली शहरात आणि आजूबाजूच्या तालुक्यांमध्ये सीएनजीवर चालणाऱ्या वाहनांची संख्या वाढत चालली आहे. मात्र, उपलब्ध असलेला एकमेव सीएनजी पंप अपुऱ्या व्यवस्थापनामुळे अडचणीचा विषय ठरत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पंप चालक वेळेत पंप सुरु करत नाही, काही वेळा मध्यंतरात पंप बंद ठेवला जातो आणि अनेकदा 'नेटवर्क नाही', 'प्रेशर नाही, अशा कारणांनी सेवा थांबवली जाते.

वाहनधारक सांगतात की, पहाटेपासूनच सीएनजी भरण्यासाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. काही वेळा चार-पाच तास रांगेत उभे राहूनही गाडीला गॅस मिळत नाही. या गैरसोयीमुळे टेम्पो, ऑटो आणि इतर व्यावसायिक वाहनचालकांचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रवाशांना वेळेत सेवा देता येत नाही, त्यामुळे त्यांच्या ग्राहकांकडूनही तक्रारी वाढल्या आहेत.

गॅस पंपावर आवश्यक सुविधा, योग्य व्यवस्थापन व शिस्तबद्ध सेवा अभावी वाहनधारक वैतागले आहेत. दरम्यान, संबंधित पंप चालकाला अनेकदा तक्रारी देऊनही कोणतीही सुधारणा झालेली नाही, असा नागरिकांचा आरोप आहे. प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी करण्यात येत आहे. या प्रकारांमुळे स्थानिक वाहनधारकांमध्ये तीव्र नाराजी आहे. हिंगोलीतील रहिवासी आणि वाहन मालकांनी जिल्हा प्रशासनाकडे मागणी केली आहे की, या पंपाची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी. तसेच, अधिक सीएनजी पंप उपलब्ध करून देण्यात यावेत, जेणेकरून नागरिकांना दिलासा मिळेल.

# हिंगोलीत रोजगार मेळाव्यात ९६ उमेदवारांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ ऑगस्ट**
जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर व तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच सेनगाव येथील तोष्णीवाल महाविद्यालयात पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर या पात्रतेच्या २३३ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९६ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर हे होते. तर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य आर. व्ही. बोथीकर, महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष रमन तोष्णीवाल, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त बालाजी मरे, डॉ. आर. ए. जोशी, डॉ. वाय. एस. नलवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील विविध नामांकीत कंपनीचे उद्योजक उपस्थित होते. तसेच जिल्ह्यात विविध महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यासाठी विविध महामंडळाचे स्टॉल लावण्यात आले होते. या मेळाव्यात मार्गदर्शन करताना प्राचार्य बोथीकर यांनी मुलाखतीचे ठोकताळे सांगत करियरसाठी स्वत:चे गाव सोडून उमेदवारांनी मिळेल तेथे नोकरी मिळवावी आणि स्वत:ची क्षमता सिद्ध करावी, असा मंत्र दिला. रमण तोष्णीवाल यांनी आपल्या परिसरातील कामाच्या मागणीनुसार स्वत: रोजगार मिळवत युवकांनी रोजगार निर्मिती करणारे बनावे, असे आवाहन केले. सहायक आयुक्त बालाजी मरे यांनी साचेबद्ध सरकारी नोकरीची अपेक्षा न बाळगता खाजगी क्षेत्रातील संधीचे सोने करावेत, असा सल्ला दिला. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता हिंगोली या कार्यालयाचे नवनाथ टोनपे, राजाभाऊ कदम, नागेश निरदुडे, रमेश जाधव, पवन पांडे, प्रवीण राठोड, अभिजीत अलोने आणि तोष्णीवाल महाविद्यालयाचे प्राध्यापक ए. पी. नाईक, डॉ. एन. एस. बजाज, डॉ. पी. एन. तोतला, डी.डी.थोरात, एस. एस. मरकड, डी. पी. तडस, एन. एस. गायकवाड, के. एस. पवार, एच. टी. शिंदे, इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



**हिंगोली- अवघ्या दोन दिवसांवर श्री गणरायांचे आगमन होणार असून यानिमित्त हिंगोली शहरात विविध ठिकाणी गणेश मंडळाच्यावतीने गणेश मूर्ती स्थापनेसाठी सुंदर, आकर्षक अशा मंडप, रोषणाई तसेच सजावटीची तयारी करण्यात येत आहे. अकोला बायपास येथील शिवनेरी चौकात रूद्राक्ष गणेश मंडळाच्यावतीने भव्य मंडपाची तयारी करण्यात येत आहे. छाया-सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### बागी-४ चित्रपटात हिंगोलीच्या बालकलाकार



हिंगोली- जिल्ह्यातील डी इफेक्ट डान्स अॅकॅडमी च्या विद्यार्थ्यांनी कु. तेजस्वी राजकुमार मोरगे व कु. माही स्वप्नील घुगे या दोन मुली बागी ४ चित्रपटात बालकलाकार (लहळश्रव ींळीं)म्हणून भूमिका साकारणार आहेत. बहुचर्चित तथा यशस्वी दिग्दर्शक ए. हर्षा यांनी दिग्दर्शन केलेला बागी ४ चित्रपट येत्या काही दिवसांत देशभरात नव्हे तर जगभरात प्रदर्शित होणार आहे. सुप्रसिद्ध अभिनेता टायगर श्रॉफ, संजय दत्त तसेच अभिनेत्री हरनाझ सिंधू कौर , सोनम बावेजा यांची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट प्रेक्षकांसाठी मेजवानी ठरणार आहे. अशा मोठ्या पडद्याच्या चित्रपटात हिंगोली जिल्ह्यातून बालकलाकार म्हणून प्रथमच तेजस्वी मोरगे व माही घुगे यांना संधी मिळाली आहे. त्याबद्दल जिल्हाभरातून कौतुक होत आहे. सत्या ड्रीम स्टुडिओ मुंबई, येथे या बालकलाकारांची शूटिंग नुकतीच पूर्ण झाली आहे. या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

### एचआयव्ही संवेदीकरण कार्यशाळा संपन्न

हिंगोली- येथील जिल्हा रुग्णालयातील जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाच्या वतीने हिंगोली रेल्वे स्टेशन येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची एचआयव्ही/एड्स संवेदीकरण कार्यशाळा रेल्वे स्टेशन येथे संपन्न झाली. यावेळी रेल्वे इंजिनिअर श्री. सर्वेश, जिल्हा कार्यक्रम अधिकारी डी. एस. चौधरी व रेल्वे विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी समुपदेशक बालाजी चापाकानाडे यांनी एचआयव्ही एड्सबद्दल सखोल माहिती दिली, तर जिल्हा कार्यक्रम अधिकारी डी.एस.चौधरी यांनी २०१७ चा एचआयव्ही/एडस् कायदा, जिल्ह्यातील एचआयव्हीची सद्यस्थिती सांगून सर्वांच्या शंकांचे निरसन केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी संजय पवार, आशिष पाटील, टीना कुंदणानी, बालाजी चापाकानडे, इरफान कुरैशी यांनी परिश्रम घेतले.

### अनोळखी एपीके फाईल ओपन करू नका

हिंगोली- सायबर फ्रॉड टाळण्यासाठी कुणीही अनोळखी एपीके फाईल ओपन न करण्याचे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे. तसेच अनोळखी फ्रेंडस् रिक्वेस्ट एक्सेप्ट करू नये, अनोळखी फ्रेंड यांना लिस्टमधून रिमुव्ह करावे, अनोळखी व्हीडीओ, कॉल उचलू नये, ओटीपी शेअर करू नये, अनोळखी ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये तसेच सायबर फ्रॉड झाल्यास तत्काळ १९३० किंवा १९४५ वर कॉल करून तक्रार नोंदवावी असे आवाहन कोकाटे यांनी केले आहे.

# देवकरवाडी येथील आदिवासी कुटुंबांवर अन्याय



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ ऑगस्ट**
सेनगाव तालुक्यातील देवकरवाडी येथे किरकोळ कारणावरून एकास मारहाण करीत जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली. याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल केल्यानंतर या गावातील आदिवासी कुटुंबाची वीज, पाणी बंद करण्यात आली आहे. यासंदर्भात आदिवासी ०समाजातील महिला, पुरूषांनी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची भेट घेतली. कोकाटे यांनी तत्काळ या घटनेची दखल घेत संबंधित गावात तहसीलदार व पोलिस अधिकाऱ्यांना चौकशीसाठी पाठवले आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की काही दिवसांपूर्वी सेनगाव तालुक्यातील देवकरवाडी येथे किरकोळ कारणावरून एकाला मारहाण करीत जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली. या प्रकरणी संबंधित व्यक्तीने पोलिस ठाण्यात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल का केला या कारणावरून गावातील आदिवासी कुटुंबांना पाणी, वीज, रस्ता तसेच किराणा तसेच शेतातील वीज पुरवठा बंद करून संविधानिक अधिकारापासून दूर करून आदिवासी कुटुंबावर अन्याय करीत असल्याची तक्रार दि २५ ऑगस्ट रोजी आदिवासी समाजाच्यावतीने पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेकडे करण्यात आली आहे.

# मराठा सेवासंघ जिजाऊ ब्रिगेडतर्फे रविवारी गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २५ ऑगस्ट**
मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड व इतर कक्षांच्या वतीने, मराठा समाजातील शैक्षणिक यश प्राप्त करणाऱ्या प्रतिभावंत विद्यार्थ्यांचा तसेच गुननांचा गौरव सोहळा दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी रविवारी सकाळी ११ वाजता कै. शिवाजीराव देशमुख सभागृह रामलीला मैदान हिंगोली येथे आयोजित केला आहे. त्या निमित्ताने समाजातील इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये ८५ टक्के, इयत्ता बारावीच्या परीक्षेमध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास, मेडिकल - इंजीनियरिंग किंवा इतर कुठल्याही व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा, तसेच कुठल्याही शाखेचा पदवीधर किमान ७५ टक्के गुण घेतलेला विद्यार्थी, कुठल्याही शाखेचा पदव्युत्तर मध्ये प्रवेश घेऊन प्रथम श्रेणी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी - पीएचडी प्राप्त संशोधक, क्रीडा क्षेत्रामध्ये विशेष प्राविण्य प्राप्त खेळाडू, एनटीएस, एमटीएस, अबॅकस, शिष्यवृत्ती परीक्षा इत्यादी सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थी, सांस्कृतिक, कला, क्रीडा क्षेत्रामध्ये किमान विभाग स्तरावर निवड झालेले विद्यार्थी, सेवानिवृत्त कर्मचारी, कृषी समाजसेवा,उद्योग क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केलेले व्यक्ती यांचा सत्कार होणार आहे. त्यासाठी करावयाचे नाव नोंदणी दिनांक २८ ऑगस्ट २०२५ पर्यंत सुधाकर बल्लाळ, राजकुमार वायचाळ, सीमा वडतकर, पंडित शिरसाट, पंडित अवचार, साधनाताई हेंबाडे, हरिभाऊ मुटकुळे, प्रा. विकास कल्याणकर, विश्वास वानखेडे, सुरेश मईंग, माधव जाधव, शिवराज सरनाईक, महेश राखोंडे, राजकुमार कराळे, विजय पवार, प्रा. सुभाष जगताप, कैलास डीडाळे, शिवशंकर डोल्हारे , प्रा. उद्धव इंगोले, प्रा. माणिक डोखळे, संतोष परांडे एन. टी. शिंदे, ए डी वानखेडे यांच्याकडे करावयाची आहे, असे आवाहन मराठा सेवा संघ व इतर ३३ कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# औंढा ते नंदगाव, अंजनवाडा मार्गे बंद झालेली बस तत्काळ सुरू करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ ऑगस्ट**
औंढा नागनाथ तालुक्यामध्ये हिंगोली आगारामार्फत बस फेऱ्या चालवल्या जातात परंतु वाहतूक नियंत्रकाच्या मनमानी कारभारामुळे तालुक्यातील बस फेऱ्या बंद करण्याचा सपाटा लावल्यामुळे अंजनवाडा येथील विद्यार्थी व ग्रामस्थांनी निवेदन देऊन औंढा ते नंदगाव मार्गे अंजनवाडा गाडी पूर्वीच्या वेळापत्रकाप्रमाणे दुपारी दोन वाजता चालू करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

औंढा नागनाथ तालुक्यात औंढा ते नांदगाव मार्गे अंजनवाडा सिद्धेश्वर ही दुपारी दोन लाजाणारी बस सेवा अचानक वाहतूक नियंत्रकाने बंद केली. त्यामुळे विद्यार्थी, ग्रामस्थ व प्रवाशी यांना चार तास बस स्थानकावर ताटकळत बसावे लागते. यासोबतच औंढा ते जामगव्हाण ही सायंकाळी सहा वाजता जाऊन येणारी बस सेवा बंद झाल्यामुळे जामगव्हाण परिसराकडून येण्यासाठी दुपारी दोन वाजता पासून कुठलीही बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थी व प्रवाशांचे हाल होत आहेत. सकाळपासून आलेले विद्यार्थी, विद्यार्थिनी चार वाजेपर्यंत अंजनवाडा सिद्धेश्वर, नंदगावला जाण्यासाठी बसची प्रतीक्षा करतात. यामुळे विद्यार्थ्यांसह प्रवाशांना सुद्धा ताटकळत बसावे लागते. रिपब्लिकन सेनेचे युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे यांच्या नेतृत्वात औंढा बसस्थानकातील वाहतूक नियंत्रक शिवाजी बांगर यांना निवेदन देऊन पूर्वीच्या वेळेस औंढा नागनाथ नांदगाव मार्गे अंजनवाडा सिद्धेश्वर बस चालू करण्याची मागणी करण्यात आली. या निवेदनावर विद्यार्थीनी तसेच ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंद की चादर कार्यक्रमांतर्गत बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २५ ऑगस्ट**
हिंद की चादर श्री गुरू तेग बहादूर यांचा शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त शासकीय विश्रामगृहात सोमवारी नियोजित बैठक घेण्यात आली. या बैठकीत दि १ नोव्हेंबर रोजी हिंगोलीत बंजारा, लंबाना, शीख, शिकलकरी, सिंधी, मोहीयाल समाजाचा महामेळावा आयोजित करण्यात येणार असून त्याची पूर्वतयारी बाबत बैठकीत चर्चा व नियोजन करण्यात आले. यावेळी संतोष राठोड, नामदेव राठोड, शांताबाई चव्हाण, ॲड पंजाब चव्हाण, विजय जाधव, संदीप राठोड, दिगांबर चव्हाण, रमेश राठोड, मोहन जाधव, प्रेमदास राठोड यांच्यासह सर्व समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मार्केटिंग फेडरेशनच्या ताब्यातील गोदाम पाडल्या प्रकरणी दत्तराव हातकडके यांचे विरुद्ध गुन्हा दाखल

## मंठा बाजार समितीच्या सभापती व सचिवा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यास मंठा पोलिसांची टाळाटाळ !!

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

मंठा शहरातील मे. जगदंबा कॉटन जिनिंग अँड प्रेसिंग को. ऑ. सोसायटी लिमीटेड मंठा यांचेकडुन सर्वे क्रमांक ४२ मधिल क्षेत्र ३२०५.२५ चौ. मी. क्षेत्र / जागा ही दिनांक १३/०८/१९९० रोजी ९९ वर्षाचे कालावधीसाठी लिज करारावर दि. महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटीव मार्केटींग फेंडरेशन लि. मुंबई, अंतर्गत जिल्हा पणन अधिकारी कार्यालय, जालना यांनी घेवुन सदर जागेवर ६००० चौ. फुटामध्ये गोदामाचे बांधकाम केलेले होते. मार्केटिंग फेडरेशनच्या ताब्यातील गोदाम रात्रीच्या वेळेला पाडून नुकसान केल्याप्रकरणी जिल्हा पणन अधिकारी राजेश कृष्णराव हेमके यांच्या तक्रारीवरून दत्तराव किसनराव हातकडके यांचे विरुद्ध मंठा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे. तसेच पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत मंठा बाजार समितीचे सभापती व सचिव यांचा उल्लेख असताना मंठा पोलीस गुन्हा दाखल करण्यास का टाळाटाळ करीत आहेत? असा प्रश्न मंठा तालुक्यातील सामान्य माणसाला पडला आहे. मार्केटिंग फेडरेशनने सदर जागेची पहिल्या ३० वर्षाची मुदत ३०/०६/२०१९ रोजी संपल्याने दुसऱ्या टप्यातील पुढील ३० वर्षाचे नुतनीकरण करण्यासाठी जगदंबा जिनींग मंठा व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मंठा तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जालना यांना वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे. त्यानंतर शरद सं. तनपुरे लोकपरीरक्षक (कस्टोडीयन) जगदंबा कॉटन जिनिंग अँड प्रेसिंग को.ऑ. सोसायटी लिमीटेड मंठा, यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा, यांचे दिनांक ०८/०७/२०२१ रोजीच्या ठरावानुसार जगदंबा जिनींग यांना दिलेली ५ एकर जागा ही लिज रद्द करून ताब्यात घेतली असल्याचे दिनांक २०. ०९. २०२३ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

मार्केटिंग फेडरेशन गोदाम पाडल्या प्रकरणात अधिक माहितीसाठी माहिती घेण्यासाठी मंठा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांना फोनद्वारे संपर्क केला असता त्यांनी सांगितले की, संबंधित तक्रार अर्जात कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व सचीव यांचे नावे आहेत मात्र तपासाअंती ते नावे निष्पन्न करू.
मनोजकुमार राठोड
पोलिस निरीक्षक मंठा

त्यावर सदरील जागा कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा यांनी ताब्यात घेतल्यामुळे आमचे कार्यालयाकडुन सदरील जागेचा पुढील ३० वर्षाचा लिज नुतनीकरण करारनामा करून देणेबाबत दिनांक ३०/११/२०२३ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा यांना पत्राद्वारे कळविण्यात आले होते. परंतु कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा यांनी सदर जागेचे लिज नुतनीकरण करारनामा करुन देणेबाबत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. दिनांक ०३/११/२०२३ रोजी मार्केटींग फेडरेशनकडून महाराष्ट्र राज्यातील रिक्त असलेले गोदाम भाड्याने देण्यासाठी इ-टेंडर नोटीस काढण्यात आली होती. त्यामध्ये मंठा येथील गोदामाचेही समावेश होता. त्यावर कृषीउत्पन्न बाजार समिती मंठा यांनी उच्च न्यायालय खंडपिठ औरगाबाद येथे रिट याचीका क्रमांक १४९३५/२०२३ दाखल करून या इ-टेंडर नोटीसला स्थगीती घेतली होती. तदनंतर दिनांक ११/०८/२०२५ च्या आदेशान्वये न्यायालयाने इ-टेंडर नोटीस रद्द केली आहे. परंतु सदर जागेचा ताबा अद्याप मार्केटंग फेडरेशनकडेच असताना मार्केटींग फेडरेशनच्या ताब्यात असलेले मंठा येथील गोदाम व जागेबाबत कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा, सभापती व सचिव यांनी दत्ताराव किसनराव हातकडके व ईतर रा. मंठा ता. मंठा जि. जालना यांना नाहरकत प्रमाणपत्र देवुन कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा, सभापती, व सचिव तसेच दत्ताराव किसनराव हातकडके व ईतर यांनी आम्हास व आमचे कार्यालयास कोणतीही पुर्वकल्पना न देता अनाधिकृतपणे रात्रीचे वेळेला मंठा येथील सर्वे नंबर ४२ मधिल मार्केटींग फेडरेशनच्या ताब्यात असलेले गोदाम दिनांक १७/०८/२०२५ रोजी पुर्णपणे पाडुन नुकसान केले आहे. या प्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून मंठा पोलिसांनीत दत्तराव किसनराव हातकडके यांचे विरुद्ध गु. र. नं.४८६ (२५), कदम ३२४ (५) डॅमेज क्ट १९८४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला असला तरीही कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व सचिव यांचा समावेश असता नाही त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले नसल्याने सर्वसामान्यांतून मंठा पोलिसांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. मंठेकरांनी नाराजीया सुर पोलिसांच्या भुमिकेकडे ओठावला आहे.

### मंठा बाजार समितीत करोडो रुपयांचा घोटाळा?



## संक्षिप्त

### जिल्हाप्रमुख नळगे यांच्या पुढाकाराने बसस्थानक ते अग्निशामक दल रस्त्यावरील खड्डे बुजवताच परतुर नपचा आका झाला जागा !!

### शहरातील रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवण्यासाठी काढली ई – निविदा

तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

मागील कित्तेक वर्षापासून परतुर बसस्थानक व अग्निशामक दल या मुख्य रस्त्यावरुण सामान्य माणसाला साधे चालताही येत नसे या रस्त्यावरूण चालत आसता हालअपेष्ठा सहण करत मार्ग काढावा लागत असे या रस्त्यावर मुख्य बाजारपेठ व एकमेव मुलिंची कन्या शाळा आहे. त्या विद्यार्थिंना तसेच नागरिकांना आपला जिवमुठीत धरून चालावे लागत होते. या रस्त्याची अवस्था पाहता प्रशाषनाकडुन वेळीच योग्य त्या उपाययोजना करण्यात यायला पाहिजे होत्या मात्र येथिल सत्तेतील नेते शांतपणे बसून राहिले आहेत. हि माहिती शिवसेना ( उबाठा ) गटाचे जिल्हा प्रमुख महेश नळगे यांच्या कानी पडताच या गंभीर समस्येची दखल घेत महेश नळगे यांनी स्वत: पुढाकार घेऊन स्वखर्चाने बसस्थानक ते अग्निशामक दल या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम केले होते. या सामाजिक उपक्रमामुळे गावभागातील अनेक जेष्ठ नागरिकांनी युवा नेते नळगे यांचे स्वागत आभार व्यक्त केले. मात्र महेश नळगे यांच्या त्या सामाजिक कार्यातुन रस्त्यावरिल खड्डे बुजवण्यास सुरुवात केल्याने परतुर नगर परिषदेच्या अदृष्य शक्ती ने मुख्याधिकारी यांच्या मार्फत तात्काळ लोकमत या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करत रस्त्यावरील खड्डे बुजवण्याकरिता निविदा मागवण्यात आल्या खरंय पण खरंच जर नळगे यांनी हे रस्त्यावरील पडलेले खड्डे बुजवले नसते तर कदाचित परतुर नगर परिषदेची अदृष्य शक्ती जागी झालीच नसती असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तर ती अदृष्य शक्ती कोण परतुर नगर परिषेदेचा आतुन कारभार नेमक कोण पाहते. भारभार पाहत आसताना शहरांतील नागरी सुविधांकडे दुर्लक्ष कश्यामुळे केले जाते आणि परतुर नगर परिषदेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत तरीही सत्ताधारी पक्षातील राजकीय पुढारी परतुर शहरातीत सर्वांगीन विकासाच्या दृष्टीनेगप्प का ? तर ति परतुर नगर परिषदेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणारी अदृष्य शक्ती यापुढे तरी परतुर शहरातील नागरी सुविधा व परतुर शहराच्या विकासासाठी तत्पर राहील का असे परतुर शहरवासियांतुन चर्चेला उधाण आले आहे.

### गणेशउत्सव व ईद – ए – मिलाद सणाच्या अनुषंगाने शांतता समितीची बैठक

### पोलिस अधीक्षक अजय बन्सल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न



तभा वृत्तसेवा
अंबड /प्रतिनिधी

अंबड गणेशोत्सव आणि ईद–ए–मिलाद या दोन महत्वाच्या सणांच्या पार्श्वभूमीवर अंबड तहसील कार्यालयात पोलीस ठाणे अंबडच्या वतीने शांतता समितीची बैठक तहसील कार्यालयाच्या मीटिंग हॉलमध्ये जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, आमदार नारायण कुचे यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाली. या बैठकीस उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, तहसीलदार विजय चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे, पोलीस निरीक्षक संतोष घोडके, नगर परिषद मुख्याधिकारी मनोज उर्कीडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरमवाड, गटविकास अधिकारी श्रीमती कवडादेवी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता फेरोज शेख यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, गणेश मंडळांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत शहरातील शांतता, सुव्यवस्था व सण साजरे करताना येणाऱ्या अडचणींवर चर्चा झाली. अंबड शहरातील सामंजस्यपूर्ण सामाजिक वातावरणाचे कौतुक करताना हाजी अब्दुल समद बागवान आणि अजीम पाशा यांनी सांगितले की, अंबड शहराची खासियत म्हणजे कोणताही सण हिंदू वा मुस्लिम समाजाचा असो, सर्व समाजातील नागरिक एकत्र येऊन सण साजरे करतात. खरा तो एकच धर्म – जगाला प्रेम अर्पावे हे साने गुरुजींचे तत्त्व इथे खऱ्या अर्थाने पाहायला मिळते, असे अजीम पाशा यांनी नमूद केले.

**डीजेवर बंदी - पोलीस अधीक्षक बंसल यांचा स्पष्ट आदेश**

जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी सांगितले की, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार डीजे आणि लेझर लाईट यांना परवानगी नाही. त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. लहान मुले, वृद्ध आणि महिलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे सर्वांनी कायद्याचे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## पारधच्या झेंडू फुलांना ६० ते १०० रुपयाचा भाव!

तभा वृत्तसेवा
पारध/ प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पारध व वालसावंगी परिसरात खरीप हंगामात जून महिन्यात पावसाळ्याच्या लागवड केलेल्या झेंडूच्या फुलांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढली असून जिल्ह्यातील मार्केटमध्ये झेंडूच्या फुलांना ६० रुपयापासून ते १०० रुपयाचा दररोज हमीभाव टिकून राहत आहे. महाराष्ट्रातील दर्शनाचे स्थळे व यात्रा कायमस्वरूपी दर्शन रांगा फुल्ल राहत असल्याने या जिल्ह्यात झेंडू, मोठ्या प्रमाणात पावसाळ्यात मागणी वाढली आहे. पारध व वालसावंगी हे गाव भोकरदन तालुक्यातील मिरची लागवडीसाठी प्रसिद्ध असल्याने सर्वात मोठ्या प्रमाणात दरवर्षी २५ ते ३० हजार हेक्टर मिरची लागवड केली जाते. त्यामुळे सध्या मार्केटमध्ये झेंडूच्या फुलांचे भाव तेजीत असल्याने शहरामध्ये झेंडूच्या फुलाच्या भावाच्या तेजीत कायम दिसून येत आहे. सध्या झेंडू, शहरामध्ये मोठ्या प्रमाणात भाव खात असल्याने झेंडूच्या फुलांनी मिरची लागवडी पेक्षा तिपटीने भाव वाढून मिळत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी आतापासूनच लागवडीला प्राधान्य द्यावे अशी मागणी केली जात आहे. अशा शेतकऱ्यांना कमी शेतीत जास्त उत्पन्न मिळून लाखो रुपयांची कमाई केली जाते मात्र सोयाबीन कपाशी, मका, लागवडदार शेतकरी भाव वाढीची अपेक्षा करून नगदी पिकाकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे येणाऱ्या गणपती, नवरात्र, दिवाळी आदी सणात आणखी झेंडूच्या फुलात भाव वाढ होणार असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.



सध्या झेंडूच्या फुलांना नागपूर, कोल्हापूर, सातारा सांगली, पुणे संभाजीनगर मार्केटमध्ये फुलांची आवक कमी असल्याने सध्या ५० रुपये किलो पासून ते ७० रुपयांपर्यंत कायम भाव मिळत आहे परंतु आणखी आवक घटल्यास फुलांच्या भावात तेजी कायम राहणार आहे. हे तीन महिन्यात येणारे नगदी पीक असल्याने आठवड्याला तोडणी साठी येणारे कमी खर्चात अधिक उत्पन्न देणारे पीक आहे.
– गणेश हिम्मतराव देशमुख झेंडू उत्पादक शेतकरी वालसावंगी.

## खादगाव ग्रा.पं.च्या बोगस ठरावाविरोधात ग्रामस्थ आक्रमक; चौकशीची मागणी

तभा वृत्तसेवा
भोकरदन / प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील खादगांव येथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह ग्रामसेविकांनी संगनमत करून बोगस खोटा ठराव अंधारात लिहून जनतेची दिशाभूल करून फसवणूक केल्याने चौकशी करुन तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी शिवशक्ती कैलास आश्रमाचे शिवरुद्र योगी बाबा यांच्यासह ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भोकरदन तालुक्यातील खादगाव येथील ग्रुप ग्रामपंचायतीने दिनाक ०२ ऑगस्ट २०२५ रोजी खादगाव येथे घेतलेली ग्राम सभेची चुकीची अलौस्मेट करून लोकांची दिशा भरकटउन चुकीचा पद्धतीने लोकांकडून सह्या घेणे, तसेच ना बालकाचा १८ वर्षाच्या आतील मुलांच्या सह्या घेऊन ठराव हा लोकांना समोर न घेता अंधारात पारित केला. तसेच ग्रामपंचायत सदस्य कृष्णा पवार व गावातील अतिक्रमणधारक नागरिकांनी या ठरावाचा चुकीचा उपयोग करून खादगाव मध्ये शिव शक्ती कैलास आश्रम यांना मंदिरासाठी जागा देऊ नये. असा अर्ज सर्व कार्यालयास केला. तर ग्रामपंचायत सदस्य कृष्णा पवार हे सुस्थितीत ग्रामपंचायत सदस्य असुन त्यांनी शासकीय गायरानामध्ये त्यांच्या परिवाराने सिमेंट क्रोक्रीट ची घरे बांधून अतिक्रमण केल्याचा आरोप करुन त्यांची चौकशी करण्याची मागणी या निवेदनात केली आहे. या अगोदर २०१८ साली त्यांना जिल्हाधिका–यांनी अपात्र केले होते. ८ ऑगस्ट २०२५ रोजी झालेली ग्राम सभा खादगाव येथील मारोती मंदिरा समोर झाली. त्यामध्ये सुद्धा अशास पद्धतीने बोगस चुकीचा ठराव हा अंधारात पूर्ण केला. त्यामध्ये सूचक श्री विष्णू विठोबा पुंगळे व अनुमोदक श्री बळीराम जनार्धन पवार यांना न विचारता यांची दोघांचे नावे घेऊन अंधारात ठराव पूर्ण केला. त्यास त्यांचा तीव्र विरोध असुन त्याची चौकशी करण्यात यावी, ग्रामसभेमध्ये चर्चा वेगळी झाली आणि लिहाण्यात आले वेगळे असुन या सर्व गोष्टीचे पुरावे व चित्रीकरण उपलब्ध आहे. त्यामुळे या लोकांवर शिस्त भंग कर्तव्यामध्ये केलेल्या चुकीप्रमाणे तसेच लोकांची दिशाभूल व फसवणूक केल्यामुळे कडक कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी शिवरुद्र योगी बाबा यांनी केली आहे.

## मंदिरांच्या माध्यमातून धर्मकार्यांबरोबरच अध्यात्मातील विज्ञान समजून घेण्याची गरज–आ. लोणीकर यांचे प्रतिपादन

तभा वृत्तसेवा
मंठा / प्रतिनिधी

मंदिरांमुळे अनेक धर्मांना टिकून राहण्यास मदत झाली आहे, कारण ती केवळ पूजेची ठिकाणे नसून सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक केंद्र देखील आहेत, जिथे धार्मिक परंपरा आणि शिकवण पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली जाते. मंदिरे समाजाला एकत्र आणतात, समुदायाची ओळख दृढ करतात आणि धार्मिक भावनांना प्रोत्साहन देतात, त्यामुळे धर्माच्या निरंतरतेसाठी त्यांचे महत्त्व अनमोल आहे. धार्मिक शिकवण आणि परंपरा जतन करण्याचे काम मंदिरांनी केले आहे. मंदिरे हे धार्मिक विधी, प्रार्थना आणि उपासनेचे केंद्र आहेत. या माध्यमातून पवित्र ग्रंथ, कथा आणि नैतिक मूल्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केली जातात, सरस्वती मंगल कार्यालय मंठा येथील इस्कॉन तर्फे आयोजित व श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक केंद्र मंठा येथे २५ लाख रुपयांचा सभामंडप भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना लोणीकर म्हणाले की, इस्कॉन म्हणजेच आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाची स्थापना ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी न्यूयॉर्क येथे सर्वप्रथम केली, हे कृष्ण भक्त भक्तिमार्गाला महत्त्व देते. इस्कॉन भक्तिमार्गाला जीवनाचा सर्वात महत्त्वाचा मार्ग मानते. जगभरात इस्कॉन मंदिरे आणि केंद्रे स्थापन करते, जिथे भक्त एकत्र येऊन भजन–कीर्तन करतात आणि कृष्णभक्तीचा अनुभव घेतात असेही माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले. यामुळे लोकांच्या मनात धर्माबद्दलची आस्था अधिक दृढ होते. अनेक मंदिरे शिक्षण आणि ज्ञानाचे केंद्र म्हणूनही कार्य करतात. तेथे धार्मिक ग्रंथांचे अध्ययन केले जाते आणि लोकांना धर्माच्या तत्त्वज्ञानाचे ज्ञान दिले जाते. मंदिरांच्या वास्तुकला, शिल्पकला आणि चित्रकला यांसारख्या कलाप्रकारांचे केंद्र असतात. या कलाकृती त्या विशिष्ट धर्माची आणि संस्कृतीची ओळख दर्शवतात आणि त्यांना जतन करण्यास मदत करतात. यावेळी रासगोविंद प्रभुजी, अजित मुकुंद प्रभुजी, गोविंद दत्तप्रभू जी, कृष्ण बलदेव प्रभुजी, अंजनीपुत्र प्रभुजी, प्रेमधन प्रभुजी, अनन्यपुरुष प्रभुजी, देवपती प्रभुजी, सतीशराव निर्वळ, पंजाबराव बोराडे, अंकुशराव अवचार, बाबुराव शहाणे, गणेशराव खवणे, राजेश मोरे, कैलास बोराडे, नितीन राठोड, आनंद जाधव, दीपक बोराडे, विलास घोडके, शेषनारायण दवणे, तोफिक कुरेशी, मुसा कुरेशी, इरफान हाजी, दत्ताभाऊ बोराडे, गोपाळराव काटकर, अनिरुद्ध कातारे, अशोकराव वायाळ, मनोज देशमुख, विक्रम उफाड, सोपानराव रामकिसन मुसळे, सुभाषराव बागल, वसंतराव बागल यांच्यासह भक्त परिवार सेवेकरी लोकप्रतिनिधी पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अंकुशसर यांच्या इंस्टिट्यूटमध्ये शिकवणीतच विद्यार्थ्याला बेदम मारहाण

### लोखंडी रॉड व दगडाने हल्ला; दोन तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
बदनापूर / प्रतिनिधी

लाखो रुपये फी घेणाऱ्या खाजगी शिकवणी संस्थांमध्येही विद्यार्थी सुरक्षित नसल्याचे धक्कादायक चित्र जालन्यात समोर आले आहे. मंठा चौफुली परिसरातील अंकुश सर क्लासेस येथे शिकवणीसाठी गेलेल्या बारावीच्या विद्यार्थ्यावरच त्याच क्लासेसमधील दोन तरुणांनी लोखंडी रॉड व दगडाने हल्ला केला. या घटनेत विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेचा तपशील – पीडित विद्यार्थी यश रमेश इंगळे (वय १८, रा. सोनलनगर, जालना) हा सीईटीच्या तयारीसाठी नियमितपणे अंकुश सर इंस्टिट्यूटमध्ये शिकवणीस जात होता. शनिवारी (दि. २३) रोजी दुपारी ब्रेकदरम्यान तो वॉशरुमजवळ गेला असता, तेथे अजिंक्य सांगळे व अभिजित शिरोळे (दोघे रा. जालना) आले. त्यांनी यशला शिवीगाळ करत लोखंडी रॉड व दगडाने बेदम मारहाण केली. प्रहारामुळे यश इंगळे गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडला. त्याच्या मित्रांनी तत्काळ त्याला खाजगी रुग्णालयात दाखल केले.

पोलिसांची कारवाई– जखमी यश इंगळे याच्या जबाबावरून सदर बाजार पोलीस ठाण्यात अजिंक्य सांगळे व अभिजित शिरोळे यांच्याविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास हेड कॉन्स्टेबल सुभाष पवार करत आहेत. चेंचा विषय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी खाजगी शिकवणी संस्थांमध्ये सीसीटीव्ही, वॉर्डन व कडक देखरेखीची व्यवस्था का नाही? असा प्रश्न पालक व नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात गुन्हेगारी प्रवृत्ती डोके वर काढत असल्याने समाजात संताप व्यक्त होत आहे.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# ‘एकते’तून साकारलेला गणपती

## नरसी फाट्यातील मूर्तींना जिल्हा-राज्यभरातून भरघोस प्रतिसाद !

**आनंदा सुर्यवंशी**
**नायगाव, दि. २५ ऑगस्ट -**

नायगांव तालुक्यातील ग्रामीण भागातील नरसी येथील बंटी मुलकेवार या मुर्तीकारने दरवर्षी प्रमाणे या ही वर्षात गणेश भक्तांचे आवडी लक्षात घेऊन विविध आशा नाट्यछटा आपल्या कलेच्या माध्यमातून साकारीत हजारो मुर्त्या साकारल्या असुन महाराष्ट्र राज्यांतूनचे नव्हे तर परराज्यातून देखील अनेक गणेश मंडळानी गणेशोत्सवाच्या पुर्व संध्येला मंगलमूर्ती मोरया... चा गजर, ढोल- ताशांचा निनाद, आणि भक्तीमय वातावरणात येणारा गणराजांचा उत्सव! अशा या मंगलप्रसंगी येथील 'एकता गणेश आर्ट' मध्ये तयार झालेल्या गणपती बाप्पांच्या मुर्ती खरेदी करण्यासाठी अनेक गणपती मंडळाने आज खरेदी करण्यासाठी तुफान गर्दी झालेली पाहायला मिळाली आहे.



'एकता गणेश आर्ट' मध्ये तयार झालेल्या आकर्षक आणि नयनरम्य गणेशमूर्तींनी जिल्ह्याचेच नव्हे, तरशेजारच्या राज्यांचेही लक्ष वेधून घेतले आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही बंटी मुलकेवार व साईनाथ मुलकेवार यांच्या नेतृत्वाखालील एकता गणेश आर्ट मध्ये विविध शैलीतील गणेशमूर्तींची निर्मिती करण्यात आली आहे. मागील अकरा वर्षांत उत्कृष्ट दर्जा आणि कल्पकतेच्या जोरावर या छोट्याशा कारखान्याने स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे.

विशेष म्हणजे, यंदा नांदेडसह तेलंगणातील बोधन, निजामाबाद येथील गणेश मंडळांनीही येथे तयार झालेल्या मूर्तीसाठी आगाऊ मागणी नोंदवली आहे. त्यामुळे आता दूर पर्यंत जाऊन गणपत्ती बाप्पाची मूर्ती आणण्याची गरजच उरलेली नाही, असा समाधानाचा सूर ग्राहकांमध्ये दिसून येतो. या वर्षातील गणपती बाप्पाच्या मूर्तींची वैशिष्ट्ये या गणेश मूर्तींमध्ये शास्त्रोक्त रचना, विविध आकर्षक रंगसंगतीच्या नाट्यछटा, आणि विविध भावस्पर्शी मुद्रांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो. लहान ते मोठ्या आकारांमध्ये उपलब्ध असलेल्या या मूर्तीमध्ये पारंपरिक आणि आधुनिक शैलींचा समतोल साधलेला आढळून येत आहे.

यंदाच्या वर्षातील गणेशोत्सवाच्या पुर्वसंध्येला बुधवारी उभारल्या जाणाऱ्या मंडपांमध्ये आपल्या गणराजाची मूर्ती उत्तम आणि दर्शनीय असावी, यासाठी गणेशभक्तांची एकता गणेश आर्टमध्ये मोठी प्रचंड गर्दी पाहायला मिळत आहे.

ालुक्यातील ग्रामीण भागातील नरसी येथील स्थानिक उत्पादनाला गणेश भक्तांचे भरभरून प्रेम मिळत आहे एवढेच काय महाराष्ट्र राज्याच्या सिमेवर असलेल्या तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक या शेजारील राज्यांतून येणारा मूर्तीखरेदीचा ओघ थांबवून, स्थानिक उत्पादनाला प्राधान्य दिल्याने ग्रामस्थांतही समाधानाचे वातावरण आहे.या उद्योगातून अनेकां ना या ठिकाणी रोजगार मिळत असून, स्थानिक पातळीवर उद्योग-व्यवसाय वृद्धिंगत होतोय.

## स्व.आ.बळवंतराव चव्हाण व स्व.खा.वसंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांचे आज अनावरण

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २५ ऑगस्ट -**

नायगाव येथे मंगळवार दि. २६ ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या हस्ते हहोणाऱ्या स्व.आ.बळवंतराव चव्हाण व स्व.खा.वसंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण सोहळ्याची तयारी पूर्ण झाली असून या सोहळ्यासाठी येणाऱ्या मान्यवरांच्या स्वागतासाठी नायगाव नगरी सज्ज झाली आहे.



२६ ऑगस्ट रोजी नायगाव बाजार येथील श्री हनुमान मंदिर परिसरात सकाळी ११ वाजता होणाऱ्या या सोहळ्यासाठी माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खा.छत्रपती शाहु महाराज आदी मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती लशाभणार आहे.तसेच माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह पालकमंत्री अतुल सावे, ना. राधाकृष्ण विखे पाटील, ना. बाबासाहेब पाटील,ना.मेघनाताई बोर्डीकर, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष ह्षवर्धन सपकाळ,बाळासाहेब थोरात, माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम, नाना पटोले, माजी केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांता पाटील, माणिकराव ठाकरे, जयंत पाटील, ना.हेमंत पाटील, माजी मंत्री डी. पी.सावंत, अर्जून खोतकर, माजी मंत्री अब्दुल सत्तार, खा.रजनीताई पाटील, विजय वडेट्टीवार, भास्करराव पाटील खतगावकर, अमित देशमुख, वर्षाताई गायकवाड, सतेज पाटील, विश्वजित कदम, चंद्रकांत हंडोरे,प्रज्ञाताई सातव,ईश्वरराव भोसीकर, खा.सुरेश शेटकर, खा.किरण रेड्डी, खा.कल्याणराव काळे, खा.नागेश पाटील आष्टीकर,खा.शिवाजीराव काळगे, खा. प्रतिभाताई धानोरकर,खा.डॉ.अजित गोपछडे, खा.अमोल कोल्हे, खा.प्रणिती शिंदे, खा. शोभाताई बच्छाव, खा.डॉ.नामदेव किरसन, खा.बलवंत वानखेडे, खा.श्यामकुमार बर्वे, खा. प्रशांत पडोले, खा. इमरान प्रतापगढी, खा.अमर काळे, खा.बजरंग सोनवणे,खा.संदीपानराव भुमरे आदींसह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

सोहळ्यानिमित्त हनुमान मंदिर परिसरात दुपारी १ ते संध्याकाळी ६ या वेळेत सर्व उपस्थितांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानंतर रात्री ८ ते ११ या वेळेत ह.भ.प श्री. पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा) यांचे कीर्तन होणार असून, परिसर भक्तीमय वातावरणाने निनादणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन खासदार रवींद्र चव्हाण व चव्हाण कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुखेड तालुक्यात भीषण परिस्थिती; जनावरांच्या मृत्युमूळे शेतकरी हवालदिल

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २५ ऑगस्ट -**

मुखेड तालुक्यात १७ ऑगस्ट रोजी मध्यरात्री झालेल्या ढग फुटी सदृश पावसामुळे भीषण पूरस्थिती निर्माण झाली आहे. नद्या-नाले तुडुंब भरून वाहू लागल्याने अनेक गाव पाण्याखाली गेले. शेतकऱ्यांचे उभे पिके वाहून गेली, घरांचे प्रचंड नुकसान झाले, तर शेकडो जनावरे दुर्दैवीरित्या मृत्युमुखी पडल्याने शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत. या गंभीर परिस्थितीचा तातडीने आढावा घेत मुखेड शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विधानसभाप्रमुख मन्मथ नागनाथप्पा खंकरे यांनी पालकमंत्री अतुल सावे यांना निवेदन देऊन शासनाकडे त्वरीत मदतीची मागणी केली आहे.

मुक्रमाबाद विभागातील अनेक जनावरे गुदमरून दगावले आहेत. या जनावरांच्या मृत्यूबाबत पंचनामे करून योग्य नुकसान भरपाई द्यावी. व तसेच शेती, घरे व शेतमजुरांचे झालेल्या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करून मदत पोहोचवावी. व पूरग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याची व आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. अश्या मागणीचे निवेदन पालकमंत्री यांना देण्यात आले.



या निवेदनावर शिवसेना शहरप्रमुख सदानंद घाळे, अनिल बेल्लेवार, बालाजी कदम, प्रसाद देवणे,अन्तेश्वर गोगा, विशाल गंदिगुडे, महेश खंकरे,आकाश देवकत्ते व स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या करून शासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अशी एकमुखी मागणी करण्यात आली आहे.

**केवळ पाहणी नव्हे तातडीची मदत आवश्यक : खंकरे**

फक्त पाहणी करून फोटो काढून जाणारे नेते नकोत, तातडीची मदत द्या! आम्ही कर भरतो, मतं देतो... मग आपत्तीच्या काळात आमच्या शेतकऱ्यांना वाऱ्यावर कसे सोडता? जर शासन मदत करेत नसेल तर आमच्या शेतकऱ्यांना कोण मदत करेल. लवकरात लवकर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत करा. मुक्रमाबाद विभागात शेकडो दुधाळ जनावरे पावसाच्या प्रवाहाने वाहून, गेले तर काही जागीच गुदमरून दगावले आहेत. याची नुकसान भरपाई कोल्हापूरच्या धर्तीवर भरपाई तातडीची मिळावी अशी मागणी शिवसेना विधानसभाप्रमुख मन्मथ खंकरे यांनी केली आहे.

## काँग्रेस पदाधिकाऱ्यांची आज आढावा बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि. २५ ऑगस्ट -**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत नांदेड, लातूर, हिंगोली जिल्ह्यातील प्रमुख काँग्रेस पदाधिकाऱ्यांची जिल्हानिहाय आढावा बैठक आज मंगळवार (ता.२६) रोजी शहरातील नक्षत्र बँकेट हॉल येथे आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती९ खा. रवींद्र चव्हाण यांच्यासह दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.



**किनवट- तालुक्यात दि. १५ व १६ ऑगस्ट रोजी झालेल्या अतिवृष्टी मुळे आलेल्या पुरात वाहून गेल्याने मृत्यूमुखी पडलेल्या स्कूल वाहन चालक प्रेमसिंग मोहन पवार यांच्या पत्नी रंजना पवार यांना आज शासकीय अनुदानाचा धनादेश आमदार भिमराव केराम यांच्या हस्ते तहसील कार्यालयात आयोजित छोटेखानी कार्यक्रमात सुपूर्द करण्यात आला. या करिता आमदार केराम यांच्या पाठपुराव्यामुळे रुपये ४ लक्ष्य एवढे शासकीय अनुदान तत्काळ मंजूर झाले आहे. यावेळी तहसीलदार डॉ शारदा चौंडेकर, बाजार समितीचे सभापती गजानन पाटील मुंडे, नांदेड उत्तर भाजपा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, भाजपा समन्वयक प्रवीण श्रीमनवार, बाजार समितीचे संचालक बालाजी बामणे, भाजपा युवा नेते ज्ञानेश्वर दहिफळे आदी उपस्थित होते.**

